141

कार्यालयीन उपयोगासाठी

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# आदिवासी विकास विभागातील अनुसूचित जमातींच्या पदांचा अनुशेषाबाबतचा मूल्यमापन अभ्यास अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१

१९९६

# प्र स्ता व ना

महाराष्ट्र शासनाने मागासवर्ग सेवा योजन समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय व निमशासकीय सेवेत मागासवर्गीयांना सरळ भरती व बढती यामध्ये आरक्षण व त्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या इतर सवलती याबाबत वेळोवेळी काळानुरुप शासकीय आदेश निर्गमित केलेले आहेत व त्यानुसार मागासवर्गीयांच्या आरक्षण धोरणास बळकटी आणलेली आहे. शासनाच्या या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करताना मागासवर्ग गटातील उमेदवार त्यांच्या शैक्षणिक मागासलेपणामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामध्ये मागासवर्गीयांची पदे भरली गेली नाहीत किंवा अन्य गटातील उमेदवारांची त्या पदांवर नियुक्ती करण्यात आली. याचाच परिणाम, मागासवर्गीयांची अनेक पदे रिक्त राहून त्यांना त्यापासून वंचित व्हावे लागले. शासनाने वेळोवेळी घेतलेल्या आढाव्यानुसार मागासवर्गीयांच्या अनुशेषाचे (बॅकलॉग) प्रमाण जास्त आढळून आले. महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२९/८९/१६ ब, दिनांक १२ जुलै, १९८९ च्या परिपत्रकान्वये सरळ सेवा भरतीचा अनुशेष परिपूर्ण करण्याची मोहिम सुरु केली. तसेच पदोन्नती पध्दतीनेही अनुशेष भरण्याची मोहिम सुरु केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून अनुसूचित जमातीच्या कल्याणाच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या आदिवासी विकास विभागातील आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्या अधिपत्याखाली आयुक्तालय, अपर आयुक्त, नाशिक, अमरावती, नागपूर व ठाणे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे आणि आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या पदांबाबत अनुशेष कशा प्रकारे आहे, हे आजमाविण्यासाठी ही मुल्यमापन पाहणी घेण्यात आली आहे.

सदर मूल्यमापन पाहणीचे तसेच प्रारुप लेखनाचे काम श्री.पी.आर.तिकोने, संशोधन अधिकारी, यांनी केले आहे. माहिती संकलनाकरिता या कार्यालयातील श्री.आर.आर.साबळे, अन्वेषक व श्री.ए.एन.राऊत, अन्वेषक यांनी मदत केली. प्रारुप लेखनाचे काम त्यांनी श्री.डी.एम.रासकर, उपसंचालक, यांचे देखरेखीखाली पूर्ण केले आहे. तसेच अहवालाचे डी.टी.पी.व टंकलेखनाचे काम श्री. के.पी.कुर्डे, यांनी केले.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल आदिवासी विकास आयुक्तालय, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग कार्यालये, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये आणि आदिवासी विकास महामंडळातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना तसेच आदिवासी विकासावर संशोधन करणाऱ्यांना उपयोगी पडेल, अशी अपेक्षा आहे.

पुणे

दिनांक - ६.७.१९९६

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अ नु क्र म णि का



| अ. क्र. | प्रकरण तपशील | | पृष्ठक्रमांक पासून | पृष्ठक्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १. | प्रकरण -१ | महाराष्ट्र राज्याची प्रशासकीय यंत्रणा | ४ | ९ |
| २. | प्रकरण -२ | महाराष्ट्र शासनाचे मागासवर्गीयांबाबतचे शासकीय सेवेतील आरक्षण व अनुशेष धोरण | १० | २७ |
| ३. | प्रकरण -३ | मूल्यमापन अहवालाचा हेतू व कार्यपध्दती | २८ | ३४ |
| ४. | प्रकरण -४ | संकलित माहितीचे पृथ:करण व विश्लेषण | ३५ | ५९ |
| ५. | प्रकरण -५ | क्षेत्रीय पाहणीचे निष्कर्ष व शिफारशी | ६० | ६६ |
| ६. | परिशिष्ट-अ | | ६७ | ६९ |
| | परिशिष्ट-ब | | ७० | - |
| | परिशिष्ट-क | | ७१ | - |
| | परिशिष्ट-ड | | ७२ | - |
| | परिशिष्ट-इ | | ७३ | - |
| | परिशिष्ट-फ | | ७४ | - |
| | परिशिष्ट-ग<br>-॥- घ | | ७५<br>७६ | -<br>८१ |

## प्रकरण क्र. १

# महाराष्ट्र राज्याची प्रशासकीय यंत्रणा

### अ. महाराष्ट्र राज्य

१.१ महाराष्ट्र राज्य १६.४ अंश ते २२.१ अंश उत्तर अक्षांश आणि ७२.६ अंश ते ८०.९ अंश पूर्व रेखांशामध्ये वसलेला आहे. महाराष्ट्र राज्य लोकसंख्या व क्षेत्रफळाच्या बाबतीत भारतात तिसऱ्या क्रमांकावर असून त्याचे भौगोलिक क्षेत्र ३.०७७७ लक्ष चौरस कि.मी.आहे. भारताच्या ३२.८७३ लक्ष चौरस कि.मी.क्षेत्रापैकी ९.३६ टक्के क्षेत्र महाराष्ट्राचे आहे. विविधतेने नटलेल्या या राज्यात सातपुडा व सह्याद्री पर्वताच्या रांगा असून महाराष्ट्र, गोदावरी, कृष्णा, भीमा, तापी, वर्धा इ.नद्यांनी व्यापलेला आहे. हवाई वाहतूक, बंदरे, रेल्वे जंक्शन, बँक सर्व्हिसेस आणि रस्ते वाहतूकीचे जाळे महाराष्ट्रभर पसरलेले आहे. भारताच्या नकाशात महाराष्ट्राचे एक विशिष्ट स्थान आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून तिला देशाची व्यावसायियिक राजधानीही संबोधले जाते.

१.२ सन १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ७८७.०७ लाख असून यापैकी ११.०९ टक्के लोकसंख्या अनुसूचित जातीची व ९.२७ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. ही सर्व लोकसंख्या महाराष्ट्र राज्याच्या ३१ जिल्हयामध्ये विखुरलेली आहे. महाराष्ट्र राज्यात प्रशासकीय कार्यक्रम राबविण्यासाठी ६ महसूली विभाग, ३१ जिल्हे, ३०३ तालुके, २९ जिल्हा परिषदा, २५,८४८ ग्रामपंचायती आहेत. नागरी भागांचा कारभार पाहण्यासाठी ११ महानगरपालिका, २२८ नगरपरिषदा व ७ कटक मंडळे आहेत.

१.३ महाराष्ट्र शासनामार्फत रोजगार निर्मिती, दारिद्रय निर्मूलन, दुर्बल घटकांचा आर्थिक व सामाजिक विकास, अस्पृश्यता निवारण, औद्योगिक विकास, अन्नधान्य निर्मिती, सांस्कृतिक जतन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सिंचन क्षमता वाढविणे, शिक्षण व साक्षरता प्रसार करणे, मूलभूत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे, उर्जा निर्मिती, दळणवळण आणि विकासातील पायाभूत अडचणींचे निराकरण या विकासात्मक

गोष्टींकडे लक्ष पुरविण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर कृषी, पशुसंवर्धन, वने, सहकार, समाज कल्याण, पाटबंधारे, उर्जा, उद्योग, वाहतूक, शिक्षण, नगरविकास, गृहनिर्माण इ.स्वरुपाचे १२ विकास शीर्ष व या विकास शीर्षांतर्गत ८० उप विकास शीर्ष निर्माण करण्यात आलेली आहेत. या विकास क्षेत्र गटातील योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी व त्यांचे परिणाम तपासण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर प्रशासकीय विभागांची निर्मिती करण्यात आली असून या विभागाचा प्रमुख म्हणून सचिव कार्यरत असतात.

१.४ जिल्हा, तालुका आणि ग्रामपातळीवर शासनाच्या योजनांची व शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रकारची यंत्रणा कार्यान्वित आहे.

१. विभागीय स्तरावर महसूल आयुक्त व त्यांचा अधिकारी/कर्मचारी वर्ग
२. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व त्यांचा अधिकारी/कर्मचारी वर्ग
३. तालुका स्तरावर तहसिलदार व त्यांचा कर्मचारी वर्ग
४. ग्राम स्तरावर तलाठी

१.५ स्थानिक पातळीवर शासनाच्या योजनांची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदा, तालुका पंचायत समित्या व ग्रामपंचायतीची निर्मिती करण्यात आलेली आहे. यासाठी सरकारी कर्मचारी वर्ग काम करीत असतो. शहरांच्या वेगवेगळ्या समस्या असतात, त्या दूर करण्यासाठी महानगरपालिका, नगरपरिषदा व कटक मंडळे यांची निर्मिती केली आहे. अगदी गांव पातळीवर तलाठी, शिक्षक, ग्रामसेवक व आरोग्य कर्मचारी इ.सरकारी कर्मचारी कार्यरत असतात. थोडक्यात महाराष्ट्राची प्रशासकीय यंत्रणा बळकट असून तिचे जाळे गांव पातळीपर्यंत पसरलेले आहे. सन १९९० च्या सरकारी कर्मचारी गणनेच्या आकडेवारीनुसार सुमारे ६.४१ लाख कर्मचारी महाराष्ट्रामध्ये कार्यरत आहेत. यापैकी ५.३७ लाख कर्मचारी नियमित संवर्गातील आहेत. यामध्ये महानगरपालिका, नगरपरिषदा, कटक मंडळे, बँका, केंद्र सरकारी कर्मचारी यांचा समावेश नाही. या सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये विविध जाती, जमाती व धर्मांच्या लोकांचा समावेश आहे.

## ब. आदिवासी विकास विभाग-

१.६ महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जमात आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टया खूपच मागासलेली आहे. आदिवासींची सन १९७१ च्या जनगणनेनुसार ३८.४१ लाख, सन १९८१ च्या जनगणनेनुसार ५७.७२ लाख लोकसंख्या होती. तर सन १९९१ च्या जनगणनेनुसार ७३.१८ लाख लोकसंख्या आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या यादीत एकूण ४७ आदिवासी जमातींचा समावेश असून त्यातील प्रमुख जमाती 'भिल्ल, महादेव कोळी, परधान, डोंगरकोळी, गोंड, वारली, कोकणा, ठाकर, काथोडी, कातकरी, कोळीमल्हार, आंध, कोरकू, कोलाम, धानका हया आहेत. आदिवासी क्षेत्र हे महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पूर्व-पश्चिम सीमेलगतच्या भागामध्ये आहे. आदिवींचे वास्तव्य दुर्गम क्षेत्र व वनक्षेत्र भागात आहे.

१.७ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ नुसार समाजाच्या दुर्बल घटकांच्या उन्नतीची जबाबदारी राज्य शासनावर सोपविण्यात आली आहे. अनुच्छेद ४६ चा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे-

'राज्य शासन दुर्बल घटकांच्या, विशेषत:अनुसूचित जमातीच्या आर्थिक व शैक्षणिक हिताला विशेष काळजीपूर्वक चालना देईल व त्यांचे सर्वप्रकारच्या सामाजिक अन्यायापासून व शोषणापासून संरक्षण करील'

आदिवासींची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांचे सामाजिक अन्याय व शोषणापासून संरक्षण करण्यासाठी शासनाने निरनिराळ्या योजना आखल्या आहेत. तसेच कायदे केले आहेत. या योजना गांव पातळीपर्यंत वा आदिवासी लाभधारकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने करण्यासाठी प्रशासकीय रचना मजबूत असणे आवश्यक आहे. आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना, धोरणे व दृष्टीकोन राज्य शासनाने स्विकारले आहेत. आदिवासी विकासाला योग्य दिशा मिळण्यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात आल्या. परंतु सामाजिक व आर्थिकदृष्टया

सुधारलेल्या समाजाने त्याचा लाभ उठविल्याने पूर्वीप्रमाणेच आदिवासी हा अप्रगतच राहिला.

१.८ परिणामत: १९५४ मध्ये काही विशेष बहुउद्देशीय आदिवासी विकास गट सुरु करण्यात आले. १९५६ मध्ये त्याचा आढावा घेण्यात आला. त्यातून अधिक व्यापक आदिवासी विकास गटाची कल्पना पुढे आली. परंतु ही विकास गट नितीसुध्दा आदिवासी अर्थव्यवस्थेतील प्रशासकीय आणि संरक्षक बाजू मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिल्यामुळे परिणामकारक ठरली नाही. या योजना संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणार्थ राबविण्यात येत होत्या. पाचवी योजना सुरु होण्याअगोदर आदिवासींच्या अडचणींचा सर्वव्यापी आढावा घेण्यात आला. परिणामत: सध्याच्या 'आदिवासी उपयोजना' नितीचा उगम झाला. आदिवासींचा जलद विकास घडावा म्हणून 'आदिवासीं संचालनालयाची' स्वतंत्र निर्मिती करण्यात आली. हे संचालनालय १३.७.१९७३ पासून पुणे व पुढे १.१०.१९८१ पासून नाशिक येथे कार्यरत झाले.

१.९ आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्वे यानुसार राज्य शासनाने सन १९७५-७६ मध्ये आदिवासी उपयोजना तयार केली. त्याची अंमलबजावणी १ एप्रिल, १९७६ पासून सुरु झाली. केवळ विकासात्मक धोरणावरच जोर न देता संरक्षणात्मक धोरणावर भर देण्याचे आणि केवळ क्षेत्र विकासावर लक्ष न देता आदिवासींच्या वैयक्तिक विकासावर लक्ष देण्याचे आदिवासी उपयोजनेचे लक्ष्य आहे. यासाठी आदिवासी लोकसंख्या जास्त असलेले प्रदेश सुनिश्चित करुन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प निर्माण करण्यात आले. एका आदिवासी विकास प्रकल्पात शक्यतो दोन किंवा तीन आदिवासी विकास गटांचा समावेश करण्यात आला. आदिवासी उपयोजनेमध्ये महाराष्ट्र राज्यातील १४ जिल्हयातील ४८ तालुके व ५८०९ गांवाचा तसेच १२ शहरांचा समावेश आहे.

१.१० सध्या महाराष्ट्रात २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत असून आदिम जमातींच्या विकासासाठी एक विशेष प्रकल्प देखील कार्यरत आहे. या व्यतिरिक्त, ज्या क्षेत्रात आदिवासी लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे, अशा गांवाचा समूह करुन त्या समूहांतील आदिवासींचा विकास साधण्यासाठी ३४ माडा व २१ मिनीमाडा क्षेत्र विकास खंड तयार करण्यात आले आहेत.

१.११ अशाप्रकारे, आदिवासी लाभार्थी हा घटक धरुन शासनाने त्यांच्या उन्नतीसाठी गांवपातळीपर्यंत प्रशासकीय यंत्रणेचे जाळे पसरवले आहे. सन १९८३ पूर्वी आदिवासी विकास संचालनालयाची प्रशासकीय यंत्रणा खालीलप्रमाणे होती.

### तक्ता क्र. १.१

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग




प्रादेशिक स्तरावर संचालनालयास मदत करण्यासाठी खास कर्मचारी वर्गाची नेमणूक करण्यात आली नव्हती. जिल्हा स्तरावर विशेषत: ज्या जिल्हयामध्ये आदिवासींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे, तेथे १८ आदिवासी विकास अधिकारी, कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे काम सहयोगी कर्मचाऱ्यांमार्फत करीत असत. सन १९८२-८३ मध्ये संचालनालय व प्रशासन यावर ३७.१५ लाख रुपये इतका खर्च झाला.

१.१२ आदिवासी विकास कार्यक्रमांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने समाज कल्याण विभागाचे विभाजन करुन मे, १९८३ मध्ये स्वतंत्र 'आदिवासी विकास विभाग' मंत्रालयीन पातळीवर निर्माण करण्यात आला. तसेच विभागातील असमतोल दूर करुन चांगल्या रितीने सुसूत्रता साधण्यासाठी व बळकटीकरणासाठी जानेवारी, १९९२ मध्ये आदिवासी विकास विभागातील प्रशासकीय यंत्रणेची पुनर्रचना करण्यात येऊन संचालनालयाऐवजी 'आयुक्तालय' करण्यात आले. आदिवासी आयुक्तालयाचे मुख्यालय नाशिक येथे आहे. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर येथे विभागीय कार्यालये असून त्यांच्या अधिपत्याखाली एकूण २४ प्रकल्प अधिकारी जिल्हा स्तरावर कार्यरत आहेत. सध्याच्या प्रशासकीय यंत्रणेची रचना तक्ता क्र.२ मध्ये दर्शविल्यानुसार आहे. या प्रत्येक कार्यालयात विविध संवर्गात सुमारे ११,००० कर्मचारी काम करीत आहेत. यामध्ये आदिवासी विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. शासनाच्या मागासवर्गीयांच्या आरक्षण व अनुशेषविषयक धोरणाची चर्चा पुढील प्रकरणात केलेली आहे.

### तक्ता क्र.१.२

### आदिवासी विकास विभागांतर्गत प्रशासकीय यंत्रणा

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई



## प्रकरण क्र.२

# महाराष्ट्र शासनाचे मागासवर्गीयाबाबतचे शासकीय सेवेतील आरक्षण व अनुशेष धोरण

२.१ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६ (२) प्रमाणे कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कुळ , जन्मस्थान, निवास या व यापैकी कोणत्याही कारणावरुन राज्याच्या अखत्याराखालील कोणतीही नोकरी किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही. त्याचप्रमाणे अनुच्छेद १६ (४) अन्वये कोणत्याही गोष्टीमुळे राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही, अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

२.२ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३३५ ला अनुसरुन संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवांमध्ये व पदावर नियुक्ती करतांना अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यामधील व्यक्तींचे हक्क प्रशासनाची कार्यकक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशारितीने विचारात घेतले जातील. भारतीय संविधानाच्या कलम ३४१ व ३४२ नुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती घोषित करण्याचे अधिकार केंद्र शासनाला आहेत. या तरतूदीनुसार प्रथमत: केंद्र शासनाने १९५० साली अनुसूचित जाती व जमातींच्या याद्या घोषित केल्या. त्या आदेशांचा आधार घेऊन भूतपूर्व मुंबई शासनाने नोव्हेंबर, १९५० मध्ये सन १९४२ चे आदेश रद्द करुन मागासवर्गीयांची स्थूलमानाने ३ प्रवर्गात विभागणी केली. ते प्रवर्ग म्हणजे-

१. अनुसूचित जाती किंवा हरिजन

२. अनुसूचित जमाती किंवा आदिवासी

३. इतर मागासवर्ग

सदरील दिनांक १ नोव्हेंबर, १९५० च्या आदेशामध्ये मागासवर्गीयांसाठी खालीलप्रमाणे आरक्षण ठेवण्यात आले होते.

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी | |
|---|---|---|---|
| १. | वर्ग-१, वर्ग-२ सेवा | १२ १/२% | अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग मिळून |
| २. | वर्ग-३ सेवा | २०% | |
| ३. | वर्ग-४ सेवा | २५% | |

(शासन निर्णय पीएसडी क्र.४९०/४६, दिनांक १ नोव्हेंबर, १९५०)

वरील आरक्षणाच्या टक्केवारीत व वर्ग-३ व वर्ग-४ च्या सेवेसाठी सन १९५३ मध्ये सुधारीत टक्केवारीचे प्रमाण खालीलप्रमाणे ठरविण्यात आले.

| वर्ग-३ सेवा | | | वर्ग-४ सेवा | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी | अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी |
| १. | अनुसूचित जाती | ६% | १. | अनुसूचित जाती | ७% |
| २. | अनु.जमाती | ७% | २. | अनु.जमाती | ९% |
| ३. | इतर मागास वर्ग | ९% | ३. | इतर मागास वर्ग | ११% |

(शासन निर्णय पीएसडी क्र.४९०/४६, दिनांक २४.१. १९५३)

२.३ इतर मागासवर्गीयांना भूतपूर्व मुंबई सरकारने सन १९३३ मध्ये मान्यता दिली होती. त्या प्रवर्गाची एकत्रित यादी १९५९ मध्ये सुधारण्यात आली आणि फक्त जातीवर आधारीत अशी तयार केलेली यादी संपुष्टात आणून त्या ऐवजी उत्पन्नाच्या आधारे इतर मागासवर्गीयांची यादी बनविण्यात आली. मात्र या प्रवर्गातील लोकांना शासकीय सेवेमध्ये भरती व शिक्षणासाठी सवलती चालू ठेवण्यात आल्या.

२.४ दि.१९ ऑक्टोबर, १९५६ रोजी मा.राष्ट्रपतींनी भूतपूर्व मुंबई राज्यासाठी असलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या याद्या दुरुस्त केल्या. या याद्या फक्त मूळच्या मुंबई प्रांतासंदर्भात होत्या.

२.५ सन १९५६ मध्ये भूतपूर्व मुंबई राज्यात पूर्वीच्या मध्यप्रदेश, हैद्राबाद तसेच सौराष्ट्र आणि कच्छमधील काही मुलुखही सामील करण्यात आला. त्यानंतर १९६० मध्ये मुंबई प्रांतातून गुजरात अलग करण्यात आला आणि उर्वरित भागांचे महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. वर उल्लेखिलेल्या स्थित्यंतरामुळे म्हणजेच भूतपूर्व मध्यप्रदेश व हैद्राबाद येथील आरक्षणा संदर्भात नियम आणि आदेश यांचा पुनर्विचार करावयाची गरज भासली, जेणेकरुन महाराष्ट्र राज्यासाठी एकत्रित असे आरक्षणविषयक धोरण ठरविता येईल. यासाठी श्री.बी.डी.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नोव्हेंबर, १९६१ मध्ये एक समिती नेमली. या समितीने महाराष्ट्र राज्यातील प्रशासकीय यंत्रणा, नोकर भरती, मागासवर्गीयांचे प्रमाण, लोकसंख्या इत्यादी परिस्थितींचा आढावा व अभ्यास करुन खालीलप्रमाणे प्रवर्ग सूचित केले.

अ. अनुसूचित जमाती (विहित आदिवासी भागाच्या बाहेर राहणारे धरुन)

ब. अनुसूचित जाती व नवबौध्द

क. विमुक्त जाती व भटक्या जमाती

ड. इतर मागास वर्ग

२.६ समितीच्या शिफारशींचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०६४/१११/जे, दिनांक ९ एप्रिल, १९६५ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे सुधारीत आरक्षण जाहिर केले.

| | | |
|---|---|---|
| अ. | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| ब. | अनुसूचित जमाती | ०७ टक्के |
| क. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ०४ टक्के |
| ड. | इतर मागास वर्ग (ओबीसी) | १० टक्के |
| | एकूण | ३४ टक्के |

२.७ राखून ठेवलेल्या पदांची टक्केवारी मागासवर्गीयांची नियुक्ती करुन भरावयाच्या आरक्षित पदांची किमान संख्या दर्शविते. मागासवर्गीय उमेदवार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती धरुन गुणवत्ता या तत्वावर इतर उमेदवारांच्या तुलनेत भरतीसाठी योग्य वाटत असेल तर त्यांच्यासाठी असलेल्या विहित टक्केवारीपेक्षा अधिक प्रमाणात भरती करण्यास नियुक्ती अधिकाऱ्यांना मुभा आहे. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०६४/तीन-जे, दि.९ एप्रिल, १९६५)

२.८ मागासवर्गीयांचे आरक्षण हे खालील प्रकारची पदे भरण्याकरिता लागू असेल

१. स्थायी, अस्थायी आणि दीर्घ मुदतीची रिक्त पदे

२. निव्वळ अस्थायी आणि रजा मुदतीची रिक्त पदे

३. कार्यव्ययी आस्थापनेतील रिक्त पदे

बऱ्याच वेळेस नियुक्ती प्राधिकारी (Recruitment Authority) अस्थायी व रजा मुदतीची रिक्त झालेली पदे जी मागासवर्गीय उमेदवारांकरिता राखीव आहेत, अशा पदांवर बिगर मागासवर्गीय उमेदवारांची नियुक्ती करतात व कालांतराने ते उमेदवार कायमस्वरुपी होऊन जातात. आणि पुढे त्या राखीव पदांसाठी मागासवर्गीय उमेदवारांचा विचार केला जात नाही. त्याकरिता अशा राखीव पदांसाठीही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने मागासवर्गीय उमेदवारांचाच विचार करावा, असे शासनाने आदेश दिलेले आहेत. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७३/ईसीआर-जे, दिनांक २२.५.१९७३)

२.९ आरक्षित पदावर मागासवर्गीय उमेदवारांचीच नियुक्ती करावी. जर अशा आरक्षित पदांवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमातींचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीतर ती पदे त्या त्या जाती/जमातींचे उमेदवार उपलब्ध होईपर्यंत म्हणजे ५ वर्षापर्यंत रिक्त ठेवावीत. त्यानंतर त्या पदासंबंधीचे आरक्षण व्यपगत होते. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी - १०७२/ईसीआर-जे, दिनांक २७.६.१९७४)

२.१० आरक्षित पदे तात्पुरती किंवा कायमस्वरुपी भरता येणार नाहीत. राज्य शासनाची विविध संवर्गाअंतर्गत पदे दूरवर ग्रामीण भागात विखुरलेली आहेत. विशिष्ट गटातील मागासवर्गीय उमेदवार न मिळाल्यास लोकहिताच्या आणि प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने ती आरक्षित पदे दीर्घकाळ आरक्षित ठेवणे योग्य होणार नाहीत. म्हणून आरक्षित पदे काही अपवादात्मक परिस्थितीत बिगर आरक्षित करण्यासाठी अशा पदांना विहित प्रक्रीयेद्वारे प्रशासकीय विभागाची/मुख्यमंत्र्याची मान्यता घेणे आवश्यक आहे. अशी पदे पूर्व मंजूरी न घेता भरल्यास संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यास त्याबाबत जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१ (क)/१६ ब, दिनांक २७.३.१९९१)

२.११ जिल्हा परिषदा, स्थानिक संस्था, ग्रामपंचायती, शासकीय उपक्रम, मंडळे, महामंडळे, सहकारी संस्था, बँका, साखर कारखाने, शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था इत्यादीमध्ये मागासवर्गीयासाठी आरक्षण चालू राहील, असे शासनाने वेळोवेळी आदेश दिलेले आहेत.

२.१२ अनुशेष - जेव्हा एखाद्या प्रशासकीय विभागातील अथवा कार्यालयातील विशिष्ट प्रकारच्या संवर्गात (cadre) बिगर मागासवर्गीयांबरोबरच मागासवर्गीयांतील विविध जाती जमातींचे काही उमेदवार प्रत्यक्षात काम करीत असतात व शासनाच्या मागासवर्गीयांच्या आरक्षण धोरणातील टक्केवारीनुसार, काही मागासवर्गीय उमेदवारांची आरक्षित पदे भरलेली नसतील तर ती तूट (Shortfall) म्हणजे त्या संवर्गातील तो ''मागासवर्गीयांचा अनुशेष'' समजला जातो. एखाद्या विशिष्ट संवर्गातील अनुशेष कसा काढला जातो, त्याचा तपशील खालील तक्त्यात दर्शविला आहे.

तक्ता क्र.२.१

| विशिष्ट संवर्गातील भरतीच्या एकूण पदांची संख्या | शासनाच्या आरक्षण टक्केवारीनुसार मागासवर्गीयांचा अनुशेष | | | | प्रत्यक्षात काम करीत असलेला मागासवर्गीय कर्मचारी | | | | अनुशेष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. जा. | अ. ज. | वि.जा .भ.ज. | इ.मा.व. | अ. जा. | अ. ज. | वि.जा. भ.ज. | इ.मा.व . | अ. जा. | अ. ज. | वि.जा . भ.ज. | इ.मा.व. |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
| २०० | २६ | १४ | ८ | २० | २० | १० | ६ | ३० | ६ | ४ | २ | - |

अनुशेष एकूण भरलेल्या पदावर काढण्यात यावा. तो संवर्गातील एकूण मंजूर पदावर काढण्यात येऊ नये. यासाठी संदर्भात जी एकूण पदे भरली आहेत, त्यांची विभागणी करुन सरळ सेवा भरतीची पदे १०० बिंदू नामावली व पदोन्नतीची पदे ५० बिंदू नामावलीने घ्यावीत.

२.१३ आरक्षित पदांमध्ये मागासवर्गीयांच्या पहिल्या तीन गटातील अनुशेष कमी करण्याच्या दृष्टीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या तिन्ही गटातील जे उमेदवार गुणवत्तेनुसार निवडले जातील त्यांची गणना बिनराखीव पदांमध्ये करण्यात यावी. त्या व्यतिरिक्त वरील तिन्ही गटातील उमेदवार विहित टक्केवारीनुसार म्हणजे २४ टक्केप्रमाणे निवडले जावेत. मात्र निवडलेल्या आणि आरक्षित पदांवर निवडलेल्या मागासवर्गीय उमेदवारांची एकूण संख्या एका भरती प्रसंगी उपलब्ध असलेल्या एकूण पदांच्या ४० टक्केपेक्षा जास्त असू नये. सदर ४० टक्क्यांच्या मर्यादेमध्ये मागासवर्गीयांच्या तिन्ही गटातील पुढे चालू ठेवण्यात आलेली मागील काही पदे असल्यास त्यांचाही समावेश होतो.

२.१४ शासकीय सेवेत मागासवर्गीयांची भरती करतांना राहून गेलेला सध्याचा अनुशेष पुढील तीन वर्षामध्ये भरुन काढण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय १८.३.१९८६) पुढे ही मुदत सा.प्र.वि.क्र.१०८६/२७२१/प्र.क्र.३४३/८८/१६-ब, दि.१२.६.१९८९ अन्वये

२५.१.१९९० पर्यंत वाढविण्यात आली. शासनाने सरळ सेवा भरती व पदोन्नती (बढती) पध्दतीने हा अनुशेष भरण्याची प्रक्रीया सुरु केलेली आहे.

२.१५ महाराष्ट्र शासनाने शासकीय/निमशासकीय सेवा/महामंडळे/सार्वजानिक उद्योग यामधील मागासवर्गीय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी व त्या बाबींवरील कामांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०८०/सीआर क्र.६३/८०/१६-ब, दि.१८.११.१९८० अन्वये सचिव स्तरावर एक समिती गठीत करण्यात आली होती. अनुशेष भरुन काढण्यासंबंधी ही समिती विचारविनिमय व परिणामकारक अंमलबजावणीबाबत योग्य त्या शिफारशी करेल. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०८१/३०३०/१६-ब, दि.१५.१२.८१ अन्वये शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अ.जा.,अ.ज., वि.जा.व भ.ज., आणि इतर मागासवर्गीयांच्या सेवाभरतीतील अनुशेषाबाबत सिंहावलोकन करण्याचे आदेश दिलेले आहेत. शासकीय सेवेत मागासवर्गीयांच्या अनुशेष भरतीसंबंधी योग्य अंमलबजावणी होते किंवा नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी व योग्य तेथे तपासणी करावी, असे आदेश शासनाने त्यांना दिलेले आहेत. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०८७/१६-बी, दि.१२.२.८७ अन्वये सर्व मंत्रालयीन विभाग व कार्यालये इ.ना)

२.१६ एकच पद असलेल्या संवर्गात सुरवातीच्या अथवा त्यापुढील भरती वर्षात भरती/बढती बाबतचे आरक्षण लागू होणार नाही व ते पद बिन राखीव म्हणून समजण्यात यावे, असे आदेश सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दि.१३.१.८९ अन्वये दिलेले आहेत.

२.१७ सरळसेवा भरती पध्दतीने अनुशेष भरणे :- महाराष्ट्र शासनाने शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षित पदांवर मागासवर्गीयांची भरती करण्याबाबत सरळ सेवा भरतीबाबतचा अनुशेष भरुन काढण्यासाठी खालील सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

अनुशेष भरण्यासाठी खास प्रयत्न म्हणून विहित मुदतीत पदे जाहिर करणे, अर्ज मागविणे, मुलाखती घेणे आणि प्रत्यक्ष नेमणूका करणे इ.बाबत कालबध्द कार्यक्रमांची निश्चित करण्यात आली. (शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२९/८९/१६-ब, दि.१२.७.८९. पहा परिशिष्ट-अ)

२.१८ बृहन्मुंबईतील महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागातील नेमणूका लोकसेवा आयोगामार्फत केल्या जातात. लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या उमेदवारांच्या नेमणुका सामान्य प्रशासन विभाग मंत्रालयातील विविध प्रशासकीय विभागाकडे करते. शासनाने निश्चित केलेल्या विहित टक्केवारीनुसार आरक्षण भरुन काढण्याची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागाचीच राहणार आहे आणि नेमणूकीचे अधिकार हे सामान्य प्रशासन विभागाचे राहणार आहेत.

२.१९ प्रत्यक्ष सेवा प्रवेशाद्वारे भरावयाच्या पदांच्या संदर्भात ठरवून देण्यात आलेल्या राखीव पदांची गणना योग्य प्रकारे केली जावी, यासाठी प्रत्येक नियुक्ती प्राधिकाऱ्याने परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या नमुनेवजा १०० बिंदू नामावलीप्रमाणे पदे राखीव अथवा खुली म्हणून मोजावीत. कोणत्याही सेवा प्रवेशाच्या वेळी राखून ठेवावयाच्या रिकाम्या पदांची प्रत्यक्ष संख्या नामावलीतील स्थानांका आधारे व मागील वर्षाची तशीच पुढे चालू ठेवलेली रिक्त पदे विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी. एका नोंदवहीत बिंदू नामावलीची नोंद ठेवण्यात यावी. नामावली देताना पुढील सूचनांचे पालन करण्यात यावे.

१. प्रत्येक नियुक्ती प्राधिकाऱ्याने या आदेशाच्या प्रयोजनास्तव तयार केलेल्या प्रत्येक संवर्गासाठी अथवा सेवेसाठी किंवा पदांच्या गटांसाठी ठरवून दिलेल्या नमुन्यात स्वतंत्र नामावली ठेवावी.

२. नमुनेवजा नामावलीच्या आधारे एखादे विशिष्ट रिकामे पद राखीव अथवा खुले आहे किंवा कसे हे ठरविण्यात यावे.

३. संवर्गातील जी रिकामी पदे प्रत्यक्ष सरळ सेवा प्रवेशाद्वारे भरण्यात येतील, केवळ तेवढीच पदे नामावलीत नोंदविण्यात यावीत.

४. नियुक्ती करण्यात आल्यानंतर नामावलीत तात्काळ तपशील भरण्यात यावा आणि नियुक्ती अधिकाऱ्यांची अथवा प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची त्यावर स्वाक्षरी घेण्यात यावी.

५. ही नामावली दरवर्षी चालू लेख्याच्या (Running Account) स्वरुपात ठेवण्यात यावी. उदा.एखाद्या वर्षीच्या अखेरीस जर २४ व्या स्थानाकांपर्यंत सेवाभरती करण्यात आली असेल तर नंतरच्या वर्षी सेवाभरती करण्याचे काम २५ व्या स्थानांकापासून सुरु करण्यात यावे.

६. मागील वर्षाची तशीच पुढे चालू ठेवलेली राखीव रिक्त पदे चालू वर्षाच्या राखीव रिकाम्या पदामध्ये मिळविण्यात यावीत आणि चालू वर्षाच्या खुल्या रिकाम्या पदांच्या जागी दाखविण्यात यावीत.

७. नोंदवही सुट्या कागदांची ठेवू नये. आवश्यकतेनुसार हव्या तेवढया पृष्ठांची बांधणी केलेली कायमस्वरुपी नोंदवही असावी.

८. ४५ दिवसांपेक्षा कमी मुदतीच्या केवळ अस्थायी नियुक्त्यांची नोंद, त्या पदांना आरक्षण लागू होत असले तरी ही बिंदू नामावली नोंदवहीत करण्याची आवश्यकता नाही. (शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७०/ईसीआर-जे, दि.२३.११.७०)

२.२० काही जिल्हयामध्ये आदिवासींची संख्या १९७१ च्या जनगणनेप्रमाणे जास्त असल्यामुळे त्या जिल्हयातील वर्ग-३ सेवा व वर्ग-४ सेवामधील जिल्हानिहाय संवर्गातील (Districtwise cadres) रिकाम्या पदांपैकी जी पदे प्रत्यक्ष सेवा प्रवेशाद्वारे भरण्यात येतील. त्या पदांमधील अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या पदांची संख्या दि.६ जून, १९७२ पासून खालील जिल्हयांमध्ये त्यासमोर दर्शविलेल्या टक्केवारीनुसार असेल आणि ही टक्केवारी फक्त जिल्हास्तरीय संवर्गानाच लागू आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | ठाणे | २२ टक्के |
| २. | नाशिक | २२ टक्के |
| ३. | धुळे | २२ टक्के |
| ४. | रायगड (कुलाबा) | ९ टक्के |
| ५. | यवतमाळ | १४ टक्के |
| ६. | चंद्रपूर | १५ टक्के |
| ७. | गडचिरोली | १५ टक्के |

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७२/जे, दि.६.६.१९७२ आणि सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-११८७/२७७६/(सीआय-२९६/८७/१६-ब)/ दिनांक १५.१०.१९८७).

२.२१ ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात केल्या जातात तेव्हा अनुसूचित जमातींची भरती ७ टक्के करण्यात यावी. यात जिल्हास्तरीय संवर्ग वगळून सर्व संवर्ग येतील. जिल्हास्तरीय संवर्गासाठी भरती करतांना ज्या जिल्ह्यांसाठी भरती करावयाची आहे, त्या जिल्हयांच्या टक्केवारीच्या विहित केलेल्या बिंदू नामावलीनुसार अनुसूचित जमातीची भरती करण्यात यावी. या वाढीव टक्केवारी दिलेल्या जिल्हयांसाठी, भरती नियुक्ती अधिकारी ७ टक्के आरक्षण असलेल्या जिल्हयाचा असला तरी त्या त्या जिल्हयाच्या टक्केवारीनुसार त्याने भरती करणे आवश्यक आहे.

२.२२ आदिवासी जिल्हयांमध्ये वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील जिल्हानिहाय संवर्गातील पदे सरळसेवा प्रवेशाने भरताना स्वतंत्र १०० बिंदू नामावली जिल्हास्तरीय आरक्षण लक्षात घेऊन ठेवण्यात यावा. प्रत्येक जिल्हयासाठी ठरवून देण्यात आलेले १०० बिंदू नामावली परिशिष्ट-क,ड,इ,फ मध्ये दर्शविण्यात आले आहे. त्याप्रमाणे १०० बिंदू नामावली नोंदवही ठेवण्यात यावी. (शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०८४/(सीआर-२०४/८३)/१६-ब, दि.७ जानेवारी, १९८४)

२.२३ महाराष्ट्र शासनाने सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी खास प्रयत्नांची मोहीम १ ऑक्टोबर, १९८९ पर्यंत ठेवली होती. त्यानंतर ही मुदत १ जून, १९९० पर्यंत वाढविण्यात आली. शासकीय व निमशासकीय सेवेतील अनुसूचित जमातीच्या आरक्षित जागांचा अनुशेष भरण्यासाठी त्या गटाचे उमेदवार विविध नियुक्ती अधिकाऱ्यांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ही मोहीम ३१ मार्च, १९९१ पर्यंत वाढविली. त्यासाठी खालील उपाययोजना करण्याचे आदेश नियुक्ती प्राधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

१. मागासवर्गीयांच्या विविध गटांच्या आरक्षित असलेल्या सरळसेवा भरतीच्या पदांच्या अनुशेषाचा आढावा घ्यावा.

२. ३० जून १९८९ रोजी असलेल्या अनुशेषामध्ये जी पदे बिगर आरक्षित न करता एतदर्थ किंवा इतर स्वरुपात भरली असतील तर ती पदेही भरण्यात यावीत. अशा प्रकरणी पदांवर भरती केलेल्या बिगर मागासवर्गीयांना सेवामुक्त अथवा पदावनत करावे.

३. आरक्षित पदांचा अनुशेष भरुन काढण्याच्या सदरील खास प्रयत्नासाठी दि.३० जून, १९८९ रोजी असलेल्या सरळ सेवा भरतीच्या पदांचा अनुशेष वेगळा आरक्षित गट म्हणून दाखविण्यात यावा. याबाबत एका भरतीप्रसंगी ५० टक्केपेक्षा जास्त पदे आरक्षित ठेवता येणार नाहीत. असे जे सर्वसाधारण आदेश आहेत, ते ह्या आरक्षित सरळ सेवाभरतीच्या अनुशेषाला लागू होणार नाहीत.

४. सर्व संबंधित सेवा योजना कार्यालये, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी विकास/प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ आणि संचालक, आदिवासी विकास यांनी पुरस्कृत केलेल्या यादीनुसार आलेल्या उमेदवारांना मागणीपत्र द्यावे. तसेच या उमेदवाराबरोबर जाहिरातीद्वारे मागविलेल्या अर्जाचाही याबरोबर विचार करण्यात यावा.

२.२४ विशेष भरती मोहिमेच्या संदर्भात मागासवर्गीयांचा दि.३० जून, १९८९ पर्यंतचा सरळसेवा भरतीचा अनुशेष भरुन काढताना राखीव पदांवर बिगर मागासवर्गीयांची

नियुक्ती केली असल्यास त्यांना सेवामुक्त करण्यात येऊ नये, असे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. रिक्त जागांच्या अभावी जर संपूर्ण अनुशेष भरुन काढता आला नाही तर निवड केलेल्या उमेदवाराची प्रतिक्षा यादी करावी व त्यांची भविष्यात रिक्त होणाऱ्या सर्व १०० टक्के जागांवर प्रतिक्षा यादी संपेपर्यंत नियुक्ती करण्यात यावी. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही कार्यालयामध्ये रिक्त जागा उपलब्ध नाहीत. म्हणून अनुशेषच काढण्यात आला नाही किंवा जाहिरात देण्याची वा उमेदवारांची निवड करण्याची कार्यवाहीच करण्यात आलेली नाही. ही स्थिती शासकीय आदेशानुसार बरोबर नाही. (शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२९/८९/१६-ब, दि.३० सप्टेंबर, १९८९.)

२.२५ पदोन्नती पध्दतीने अनुशेष भरुन काढणे.

ज्या श्रेणीमध्ये अथवा सेवामध्ये प्रत्यक्ष सेवाभरतीद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांची संख्या ५० टक्केपेक्षा अधिक होत नसेल, अशा श्रेणीतील अथवा सेवांतील वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ यामधील सर्व पदांवर नेमणूका करण्यासाठी 'योग्यतेनुसार वरिष्ठता' (Seniority subject to fitness) या तत्वावर पदोन्नती देताना अनुसूचित जाती-१३ टक्के, अनुसूचित जमाती ७ टक्के आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती-४ टक्के अशी एकूण २४ पदे या तीन गटांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सेवा वर्ग-१ मधील प्रथम पदोन्नतीनंतर देण्यात येणाऱ्या पदोन्नत्या, योग्यता व जेष्ठता या तत्वावर देण्यात येत नसून त्या काटेकोर निवड (By strict selection) करुन देण्यात येतात. पदोन्नतीमध्ये वर्ग-१ च्या प्रथम पदोन्नतीपर्यंतच मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. यासाठी विभागीय पदोन्नती समित्यांची रचना करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या असून यासाठी एखादा मागासवर्गीय अधिकारी उपलब्ध असेल तर त्याची विभागीय पदोन्नती समितीवर नेमणूक करावी. पदोन्नती समितीकडे पदोन्नतीसंबंधीचे प्रस्ताव विचारार्थ पाठविताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत.

१. एखाद्या वर्षात भरती करण्यासाठी उपलब्ध असलेल्या पदांच्या संख्येच्या प्रमाणात राखीव पदांची संख्या निश्चित करण्यासाठी परिशिष्ट-ग मध्ये दर्शविल्याप्रमाणे एक स्वतंत्र ५० बिंदू रोस्टर नामावलीचा वापर करावा. ज्या रिकाम्या पदासाठी निवडसूची तयार करावयाची असेल त्या एकूण रिकाम्या पदांपैकी या प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या रिकाम्या पदांची संख्या ठरविण्यासाठीच केवळ या नामावलीतील स्थानांक आहेत. नामावलीतील स्थानांक हे वरिष्ठता ठरविण्यासाठी किंवा पदोन्नतीचा क्रम ठरविण्यासाठी नाहीत.

२. निवड सूची मागासवर्गीयांच्या तीन गटांसाठी करावयाची आहे. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची प्रत्येक गटाची स्वतंत्र अशी उपलब्ध पदांच्या व आरक्षित पदांच्या प्रमाणात निवड सूची बनविण्यात यावी. राखीव पदे (चालू आरक्षण व मागील पुढे नेण्यात आलेली -कॅरी फॉरवर्डस अनुशेषाची पदे मिळून) एकूण पदांच्या ५० टक्के पेक्षा अधिक नसावी. अधिक होत असतील तर निवड सुचित आरक्षित पदांची जेवढी संख्या असेल त्या प्रमाणात सर्वात जुनी व पुढे नेण्यात आलेली अनुशेषाची पदे क्रमवारीने प्रथम भरण्यात यावीत. उदा.प्रथम ज्या पदांना ३ भरती वर्षे होणार आहेत, ती पदे, नंतर दोन भरती वर्षे झालेली व १ भरती वर्षे झालेली या क्रमाने पदे भरण्यात यावीत. असे करताना जर चालू आरक्षणाची पदे पुढे व पुढे नेण्यात आलेली पदे ही ५० टक्के मर्यादेच्या अधिन राहिल्यामुळे शिल्लक राहत असतील तर आरक्षित बिंदू पुढे नेण्यात यावीत. पदोन्नतीची राखीव पदे, ३ भरती वर्षे पुढे नेऊन व्यपगत होतात. त्यासाठी ती कमीत कमी व्यपगत व्हावीत, हे पहावे.

३. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये विशेष सहानुभूतीचे धोरण दाखविण्याचे आदेश आहेत.

४. ज्यावेळी बिंदु नामावलीनुसार आरक्षित पदे उपलब्ध नसतील व मागासवर्गीय त्यांच्या ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस उपलब्ध असतील तर त्यांना केवळ आरक्षित पदे

उपलब्ध नाहीत, म्हणून पदोन्नती नाकारण्यात येऊ नये त्यांना त्यांच्या जेष्ठतेनुसार बिनराखीव पदावर पदोन्नती देण्यात यावी.

५. विभागीय पदोन्नती समितीकडून तयार करण्यात आलेल्या मागासवर्गीयांच्या निवड सूचीची एक संयुक्त निवडसूची करण्यात यावी व या संयुक्त सूचीमध्ये सर्वसाधारण अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील निवड केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नांवे ज्या प्रवर्गामधून किंवा श्रेणीमधून पदोन्नती द्यावयाची असेल त्या प्रवर्गाच्या किंवा श्रेणीच्या मूळ जेष्ठता सुचितील त्यांच्या परस्पर जेष्ठताक्रमाने लावण्यात याव्यात. यानंतर अशाप्रकारे तयार केलेली संयुक्त निवड सूची त्या वर्षामध्ये जसजशी पदे रिक्त होतील, तसतशी त्या पदांवर पदोन्नती देण्यासाठी वापरण्यात यावी.

६. एखाद्या वर्षी अपेक्षित रिक्त पदांची संख्या कधी कधी अत्याधिक अंदाज (ओव्हर एस्टीमेटेड) करुन बनविल्या जातात. परिणामी मागासवर्गीयांच्या तीन गटांना ते आरक्षणानुसार पदोन्नती मिळण्यास पात्र असूनही त्याचा फायदा त्यांना मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन शासनाने यासाठी काही पूरक सूचना निर्गमित केल्या आहेत.

अ. निवड सूची वर्षाच्या वर्षाला बनविणे. निवडसूची तयार करताना पुढील वर्षी किती रिक्त पदे उपलब्ध होतील याचा अचूक अंदाज करावा. अत्याधिक अंदाज करु नये.

ब. वर्षाच्या शेवटी काही कर्मचारी पदोन्नत न होता निवड सूचीवर राहिले तर ती निवडसूची व्यपगत न समजता तशीच पुढे चालू ठेवावी. पूर्वीच्या सूचीवरील नांवे संपुष्टात आल्यानंतरच पुढील वर्षीच्या निवड सूचीवरील नांवे उपयोगात आणावीत. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७२/१२२/७८७/सोळा-, दिनांक २ मार्च, १९७७)

क. सर्वसाधारणपणे अ.जा., अ.ज. व वि.जा.भ.ज. मधील कर्मचारी संयुक्त निवड सूचीमध्ये खालच्या क्रमांकावर असतात आणि पदे रद्द झाल्यामुळे वरिष्ठ व्यक्तींना त्यांच्यामुळे विभागात परत पाठविण्यात आल्यामुळे अ.जा., अ.ज. व वि.जा.भ.ज मधील

कर्मचारी कनिष्ठ असल्यामुळे तिला पदावनत केले तर पदोन्नतीनुसार भरलेल्या पदामध्ये अनुशेष निर्माण होण्याचा संभव असतो. अशा परिस्थितीत पदावनती करावयाची झाल्यास अगोदरच सेवेत असणाऱ्या मागासवर्गीयांची पदोन्नतीच्या संवर्गातील संख्या ही राखून ठेवावयाच्या पदांच्या विहित टक्केवारीपेक्षा अधिक होत नसेल तर व पदावनती केल्यामुळे अनुशेष निर्माण होणार असेल तर त्या मागासवर्गीयांना पदावनत करु नये. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७८/१३०/सोळा-बी, दिनांक १९ मार्च, १९७९)

ड. अशी निवडसूची सर्वसाधारणपणे एका वर्षाच्या मुदतीसाठी अंमलात राहील. परंतु ती मुदत उक्त सूचीत समाविष्ट केलेल्या ज्या अधिकाऱ्यांना एक वर्षाच्या सर्वसाधारण मुदतीत पदोन्नती दिली नसेल अशा अधिकाऱ्यांना वाढीव मुदतीत पदोन्नती देण्यात यावी. ही मुदत म्हणजे पुढे सहा महिन्यांकरिता वाढवावी. (शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७२/जे, दि.२३ मे, १९७४)

२.२६ जी रिकामी पदे अस्थायी आहेत आणि जी तीन महिन्याच्या किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी चालू राहण्याची शक्यता आहे आणि जी पदोन्नती देऊन भरण्यात येणार आहेत, अशा रिक्त पदांना सुध्दा वरील आदेश लागू करण्यात यावेत. निव्वळ तात्पुरती रिक्त पदे पदोन्नतीसाठी विचारात घेण्याची आवश्यकता नाही. (शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७२ऊजे/दिनांक ६.९.१९७४)

२.२७ ज्या सेवेमध्ये थेट भरतीचे प्रमाण ५० टक्केपेक्षा अधिक नाही, अशा सेवेमधील वर्ग-१ मधील पहिल्या टप्प्याच्या पदोन्नतीपर्यंत सर्व बढत्यांच्या संबंधात अ.जा.,अ.ज.,वि.जा.भ.ज. यांच्यासाठी थेट पदे राखून ठेवण्याची तरतूद शासनाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७२/जे दि.२३ मे, १९७४ आणि क्र.एसआरव्ही-१०७४/डी, दि.२८.१.७५ अन्वये केली होती. त्यामध्ये अंशत: फेरफार करुन शासनाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०७५/१३७०/१२५४/(अ) सोळा-, दि.३१ जुलै , १९७६ अन्वये ज्या प्रवर्गात

किंवा सेवेमध्ये भरतीचे प्रमाण ५० टक्के ऐवजी ६६ २/३ टक्कयांपेक्षा अधिक होत नसेल अशा सेवेमधील वर्ग-१ मधील पहिल्या टप्प्याच्या पदोन्नतीपर्यंत सर्व बढत्यांच्या संबंधात अ.जा.,अ.ज., वि.जा.भ.ज. यांच्यासाठी राखीव पदाची तरतूद लागू करण्यात आली आहे.

२.२८ मागासवर्गीयांतील शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांची कार्यक्षमता विचारात घेताना विशेष सहानुभूती दाखविण्यात यावी. ते खरोखरच बढती देण्यास पात्र नसतील अथवा शिक्षा म्हणून त्यांना बढती न देण्याचा आदेश सक्षम प्राधिकाऱ्याने दिला असेल तरच फक्त त्यांना पदोन्नती देण्याचे नाकारण्यात यावे. अन्यथा त्यांना पदोन्नती नाकारण्यात येऊ नये.

२.२९ वर्ग-३ मधून वर्ग-३ मधील वरिष्ठ पदांवर वर्ग-२ मधून वर्ग-२ मधील वरिष्ठ पदांवर आणि वर्ग-१ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्यंतच्या पदांवर पदोन्नती करतानाही निम्न पदावर ३ वर्षांची किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्वअट म्हणून विहित करण्यात यावी.

२.३० शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०८९/प्र.क्र.३३८/८९/सोळा-ब, दि.३० सप्टेंबर, १९८९ अन्वये शासनाने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ मधील मागासवर्गीयांचा पदोन्नतीच्या कोट्यातील दि.३१ ऑगस्ट, १९८९ पर्यंतच्या अनुशेषाचा आढावा घेऊन तो अनुशेष दिनांक ३१ डिसेंबर, १९८९ पर्यंत भरुन काढण्याची कार्यवाही करावी, असे आदेश दिले. नंतर ही मुदत ३१ मार्च, १९९१ पर्यंत वाढविण्यात आली.

२.३१ शासकीय सेवेत मागासवर्गीय उमेदवारांची भरती करण्यासंबंधीच्या आदेशाची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे करण्याच्या हेतूने सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्ष, विभागीय महसूल आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेवर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित करुन मागासवर्गीयांचे आरक्षण भरण्याच्या धोरणात सुसंगतपणा व लवचिकता आणली आहे.

उदा.गोपनीय अहवाल हेतुपुरस्सर नकारात्मक लिहू नयेत, नामावली हे गोपनीय कागदपत्र नसल्याने त्याबाबत गुप्तता न पाळता अनुशेष व भरती दर्शविणारा तक्ता बोर्डावर लावणे, आरक्षण व अनुशेष भरण्याबाबत टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणे, ज्या संस्था (शासकीय/निमशासकीय) अनुशेष वा आरक्षण भरण्याबाबत टाळाटाळ करतील, अशा संस्थांना शासनामार्फत देण्यात येणारे अनुदान रोखण्याबाबतची कारवाई, नोकरी अर्जाच्या फीमध्ये सवलती, वयाची अट ५ वर्षांनी शिथिल करणे, मुलाखतीसाठी येणाऱ्यांना प्रवासभत्ता देणे, मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना आपली गाऱ्हाणी मंत्र्यापुढे मांडण्याची परवानगी देणे इत्यादी.

२.३२ शासनाने मंडल आयोगाचा स्विकार केल्यानंतर इतर मागासवर्गीयांना शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण वाढवून दिले. तसेच राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग आरक्षण टक्केवारीत वाढ करण्यात आली आहे. ती वाढ खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व नवबौध्द | १३ टक्के |
| २. | अनुसूचित जमाती | ०७ टक्के |
| ३. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | ११ टक्के |
| ४. | इतर मागास वर्ग | १९ टक्के |
| ५. | विशेष मागास वर्ग | ०२ टक्के |
| | एकूण | ५२ टक्के |

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/सोळा-ब, दि.२३ मार्च, १९९४ व शासन निर्णय, क्र.बीसीसी-१०९४/३६०९/प्र.क्र.५६/९४/सोळा-, दि.१५.२.९६)

२.३३ आरक्षण टक्केवारीत वाढ झाल्याने आरक्षण टक्केवारी अपूर्णांकात असल्यामुळे सध्या आस्तित्वात असलेल्या १०० बिंदू नामावलीचा वापर करणे गैरसोयीचे होत आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या धर्तीवर सरळ भरतीसाठी १०० बिंदू नामावली ऐवजी २०० बिंदू

नामावलीचा वापर करावा. नाशिक, ठाणे, धुळे, कुलाबा (रायगड), यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हयातील अनुसूचित जमातीकरिता सरळसेवा भरतीसाठी असलेली वाढीव आरक्षण टक्केवारी यापुढेही तशीच चालू ठेवण्यात यावी. पदोन्नतीसाठी सध्या आस्तित्वात असलेली ५० बिंदू नामावली तशीच पुढे चालू ठेवण्यात यावी, असे निर्णय शासनाने घेतले आहेत. सोबत २०० बिंदू नामावली तक्ता व शासन निर्णय परिशिष्ट-घ मध्ये दिला आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/३६०९/प्र.क्र.५६/९४/सोळा-ब, दि.१५.२ १९९६

२.३४ मागासवर्गीयांच्या ३ प्रवर्गाकरिता (अ.जा.,अ.ज.,वि.जा.भ.ज.) निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार सरळसेवा भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशी पदे ५ भरती वर्षाकरिता रिक्त ठेवावीत. ५ भरती वर्षात त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ६ व्या वर्षी खालीलप्रमाणे पदे अदलाबदलीने भरावीत. ६ व्या वर्षी त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुसऱ्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ७ व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी.

| ६ व्या वर्षी | |
|---|---|
| अनुसूचित जाती | या दोन प्रवर्गात अदलाबदली करण्यात यावी. |
| अनुसूचित जमाती | |

(शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-१०९४/सीआर-५७/९४/सोळा-ब, दि.५ डिसेंबर, १९९४)

२.३५ अशाप्रकारे, महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीयांचे आरक्षण व अनुशेष धोरण आखले असून सध्या त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत अनुसूचित जमातींच्या 'आरक्षण व अनुशेष' विषयी धोरणांची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणांमध्ये केली आहे.

# प्रकरण क्र.३

## मूल्यमापन अहवालाचा हेतू व कार्यपध्दती

३.१ महाराष्ट्र शासनाचे शासकीय नोकरीतील मागासवर्गीयांचे आरक्षण व अनुशेषाचे धोरण प्रकरण २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे. मागासवर्गीयांकरिता महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या आरक्षित टक्केवारीनुसार वर्ग-१ ते वर्ग-४ मधील विविध संवर्गामध्ये शिल्लक राहिलेला अनुशेष महाराष्ट्र शासनाने सन १९८९ पासून थेट नेमणूका (नामनिर्देशन) व पदोन्नती पध्दतीने भरुन काढण्याचे खास प्रयत्न चालू केले आहेत. शासनाच्या विविध प्रशासकीय विभागात संबंधित सामाजिक गटातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने आरक्षित पदे रिक्त ठेवण्यात आली होती किंवा सर्वसाधारण गटातील कर्मचाऱ्यांची नेमणूक त्यांच्या पदावर करण्यात आली होती. मागासवर्गीयांना शासकीय नोकरीत हमी व संरक्षण म्हणून 'आरक्षण' धोरणाचा वापर करण्यात आला व त्यानुसार रिक्त पदाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शासन स्तरावर सध्या कार्यवाही चालू आहे.

३.२ महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार आदिवासी विकास विभागात सुध्दा आरक्षण धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे आदेश सचिव व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे स्तरावर वेळोवेळी देण्यात आलेले आहेत व त्यानुसार कार्यवाही चालू आहे. महाराष्ट्र शासनाच्या या आरक्षण धोरणानुसार आदिवासी विकास विभागातील पदे भरण्यात आलेली आहेत काय ? तसेच किती अनुशेष (अनुसूचित जमातीकरिता फक्त) शिल्लक आहे? हा ह्या पाहणीचा मुख्य हेतू आहे. पाहणीमध्ये खालील उद्देश डोळ्यापुढे ठेवण्यात आलेले आहेत.

१. आदिवासी विकास विभागातील आदिवासी विकास आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील वर्ग-१ ते ४ मधील पाहणीसाठी निवडलेल्या विविध संवर्गावरील 'मंजूर पदे' 'राखीव पदे' यांचे स्वरुप समजावून घेणे.

२. आदिवासी विकास आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील पाहणीसाठी निवडलेल्या संवर्गातील राखीव पदानुसार किती अनुशेष शिल्लक आहे, हे उपलब्ध माहिती/आकडेवारीवरुन शोधून काढणे

३. सदर अनुशेषाबाबतची कारणमिमांसा जाणून घेणे व उपाय योजना सुचविणे इत्यादी.

३.३ मूल्यमापन अभ्यासाकरिता आदिवासी विकास विभागातील 'मंत्रालयीन पदांचा' विचार करण्यात आलेला नाही, कारण मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागात काम करणाऱ्या वर्ग-१ ते वर्ग-३ मधील पदांची ज्येष्ठता सूची सवंर्गनिहाय एकत्रित असते. त्यामुळे मागासवर्गीयांच्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी ही प्रशासकीय विभागनिहाय न करता ती मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांची एकत्रितपणे तयार केली जाते.

३.४ मूल्यमापन पाहणीकरिता 'आदिवासी विकास आयुक्तालयाच्या' कार्यकक्षेतील वर्ग-१ ते वर्ग-४ मधील विविध संवर्गातील मंजूर राखीव व भरलेल्या पदांची माहिती मिळविण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच १९९३-९४ हे वर्ष आधारभूत धरण्यात आले.

३.५ आदिवासी विकास आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ मधील संवर्ग व मंजूर पदांची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र.३.१
आदिवासी विकास सेवामधील संवर्गनिहाय मंजूर पदे

| वर्ग | अ.क्र. | संवर्ग | वेतनश्रेणी | मंजूर पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| .१. | .२. | .३. | .४. | .५. |
| वर्ग-१ | १. | आयुक्त, (भा.प्र.से.) | ५९००-६७०० | १ |
| | २. | अपर आयुक्त, (भा.प्र.से.) | ३७००-५००० | ४ |
| | ३. | संचालक (भा.प्र.से.) | ३७००-५००० | २ |
| | ४. | उप आयुक्त | ३०००-४५०० | ८ |
| | ५. | प्रकल्प अधिकारी गट-१ (भा.प्र.से.) | ३०००-४५०० | ११ |
| | ६. | प्रकल्प अधिकारी गट-२ | ३०००-४५०० व<br>२२००-४००० | १२ |
| | ७. | सहा.आयुक्त | २२००-४००० | ७ |
| | ८. | उप आयुक्त (भा.प्र.से.) | ३०००-४५०० | १ |
| | ९. | मुख्य लेखा व लेखा परीक्षा अधिकारी | २२००-४००० | ४ |
| | १०. | प्राचार्य | २२००-४००० | २ |

| वर्ग | अ.क्र. | संवर्ग | वेतनश्रेणी | मंजूर पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| .१. | .२. | .३. | .४. | .५. |
| | ११. | उपसंचालक | ३०००-४५०० व | ४ |
| | | | २२००-४००० | १ |
| | १२. | विधी अधिकारी | ३०००-४५०० | १ |
| | | एकूण | | ५७ |
| वर्ग-२ | १. | सहा.प्रकल्प अधिकारी | २०००-३५०० | ४६ |
| | २. | सहा.प्रकल्प अधिकारी (संशोधन) | २०००-३५०० | ४ |
| | ३. | सहा.प्रकल्प अधिकारी (सांख्यिकी) | २०००-३५०० | २ |
| | ४. | सहा.प्रकल्प अधिकारी (विशेष) | २०००-३५०० | २ |
| | ५. | लेखाधिकारी | २०००-३५०० | २ |
| | ६. | कुल प्रमुख | २०००-३५०० | २ |
| | ७. | गृह प्रमुख | २०००-३५०० | २ |
| | ८. | अधिव्याख्याता | २०००-३५०० | ४ |
| | ९. | संशोधन अधिकारी | २२००-४००० व | ११ |
| | | | २०००-३५०० | |
| | १०. | अभिरक्षी | २०००-३५०० | १ |
| | ११. | सांख्यिकी अधिकारी | २०००-३५०० | १ |
| | १२. | रचना व कार्यपध्दती अधिकारी | २०००-३५०० | १ |
| | १३. | संपादक तथा प्रसिध्दी अधिकारी | २०००-३५०० | १ |
४.३० वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, वर्ग-१ ते वर्ग-४ मध्ये अनुसूचित जमातीचे ७१ टक्के उमेदवार आदिवासी विकास महामंडळामध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत. वरील तक्त्यातील एकूण अनुसूचित जमाती उमेदवारांच्या ०.४५ टक्के उमेदवार वर्ग-१ मध्ये, ४.०३ टक्के, वर्ग-२ मध्ये, ८०.१८ टक्के वर्ग-३ मध्ये तर १५.३४ टक्के वर्ग-४ मध्ये कार्यरत आहेत. थोडक्यात महामंडळामध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक नाही. परंतू अन्य मागासवर्गीय सामाजिक गटातील अनुसूचित जाती व इतर मागासवर्गाचा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसते.

## प्रकरण क्र.५

## पाहणीचे निष्कर्ष व शिफारशी

५.१ प्रकरण ४ मध्ये महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षण धोरण व त्या धोरणानुसार आदिवासी विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील प्रादेशिक व जिल्हा पातळीवरील कार्यालयामध्ये मंजूर झालेली पदे, शासनाच्या आरक्षण धोरणानुसार झालेली राखीव पदे, भरलेली पदे व शिल्लक अनुशेष यांची सांगड संबंधित कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर घालण्यात आली आहे. त्या अनुषंगाने खालील निष्कर्ष निघतात.

### निष्कर्ष-

५.२ वर्ग-१ मधील पदोन्नतीच्या पदांना आरक्षण टक्केवारी लागू नाही. सरळ सेवा भरती पध्दतीसाठी आरक्षण टक्केवारी लागू आहे. वर्ग-१ मधील जवळ जवळ ५० टक्के पदे ही भारतीय प्रशासन सेवा/भारतीय वन सेवामधून प्रतिनियुक्तीवर भरली जातात. त्यामुळे वर्ग-१ मध्ये खुल्या गटातील अधिकाऱ्यांचे प्रमाण जास्त दिसते. सध्याची आकडेवारी पाहता वर्ग-१ मध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक नाही.

५.३ वर्ग-२ मधील पदे सरळ सेवा भरती व पदोन्नती या दोन्ही पध्दतीचा वापर करुन भरली जातात. वर्ग-२ मध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक नाही. तथापि, वर्ग-२ मधील काही संवर्गात अनुसूचित जातीचा व अन्य मागासवर्गाचा अनुशेष शिल्लक असल्याचे आढळते.

५.४ वर्ग-३ मधील महाराष्ट्रातील सर्व पदांचा आढावा घेतला असता (पहा तक्ता क्र.४.१) सुमारे ४१ टक्के अनुसूचित जमातीचे उमेदवार सेवेमध्ये असल्याचे दिसून येते. तसेच वर्ग-३ मधील इतर सामाजिक गटातील उमेदवारांचे प्रमाण शासनाच्या आरक्षण धोरणांच्या टक्केवारीशी मिळते-जुळते असल्याचे दिसून येते.

५.५ वर्ग-३ मधील पदे सरळ सेवा भरती व पदोन्नतीने भरली जातात.

ज्या संवर्गातील पदांची संख्या जास्त आहे. अशी पदे प्रस्तुत मूल्यमापन अभ्यास अहवाल करण्यासाठी निवडण्यात आली होती. यामध्ये सर्व अपर आयुक्तांच्या अधिपत्याखालील वर्ग-३ च्या पदांचा समावेश आहे.

५.६ अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अधिपत्याखाली वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अनुसूचित जमातीचा अनुशेष विशेष नसून फक्त माध्यमिक शिक्षक संवर्गात किरकोळ अनुशेष असल्याचे दिसते. मात्र अनुसूचित जातीच्या व त्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या कर्मचाऱ्यांचा अनुशेष जास्त असल्याचे दिसते.

५.७ अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांच्या अधिपत्याखालील वर्ग-३ संवर्गामधील पदांचा अभ्यास करता, अनुसूचित जमातीचा अनुशेष किरकोळ स्वरुपात असल्याचे दिसते. फक्त मुख्य लिपिक व माध्यमिक मुख्याध्यापक या संवर्गात १-१ पदाचा अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक असल्याचे दिसते. तथापि, अपर आयुक्त, ठाणे अंतर्गत वर्ग-३ मध्ये अनुसूचित जातींच्या उमेदवारांचा अनुशेष बराच शिल्लक असल्याचे दिसून येते. विमुक्त जाती व भटक्या जमातीचा अनुशेष वर्ग-३ च्या कार्यालयीन अधीक्षक , लिपिक व वाहनचालक या संवर्गात असल्याचे आढळून आले.

५.८ अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिपत्याखालील वर्ग-३ संवर्गातील पदांचा अभ्यास करता,'माध्यमिक शिक्षक' हा संवर्ग वगळता अन्य संवर्गात अनुसूचित जमातीचा अनुशेष शिल्लक नसल्याचे आढळून येते. अन्य सामाजिक गटापैकी अनुसूचित जातीचा अनुशेष 'प्राथमिक शिक्षक' या संवर्गात जास्त आढळून येतो.

५.९ अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांच्या अधिपत्याखालील वर्ग-३ संवर्गामधील पदांचा अभ्यास करता, माध्यमिक शिक्षक व आदिवासी विकास निरीक्षक या संवर्गामध्ये अनुसूचित जमातींच्या पदांचा अनुशेष आढळून आला. यातील आदिवासी विकास निरीक्षक या पदांचा अनुशेष हा तात्पुरत्या स्वरुपाचा आहे. अन्य संवर्गात अनुसूचित जमातीचा

अनुशेष शिल्लक नाही. प्राथमिक शिक्षक या संवर्गात अनुसूचित जातीचा व विमुक्त जाती-भटक्या जमातीचा अनुशेष जास्त प्रमाणात शिल्लक असल्याचे आढळले.

५.१० वर्ग-३ मधील 'माध्यमिक शिक्षक' या संवर्गात अनुसूचित जमातीचा अनुशेष ठाणे वगळता इतर अपर आयुक्तांच्या संवर्गातील पदे आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध होत नसल्याने इतर गटांतील उमेदवारामधून तात्पुरत्या स्वरुपात भरली जातात. मुलांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये, या दृष्टीने सदरची पदे भरली जातात. अनुशेषातील पदे उपलब्ध झाल्यास त्या पदांवर त्यांची नेमणूक करण्यात येते.

५.११ आदिवासी भाग हा अन्य नागरी भागापासून दूर असल्याने व तेथे नागरी सुविधांची कमतरता असल्याने तेथील पदावर काम करण्यासाठी निवड झालेले उमेदवार तयार होत नसल्यामुळे कदाचित अन्य मागासवर्गीयांचा अनुशेष शिल्लक असू शकेल.

५.१२ वर्ग-१ व वर्ग-२ मधील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळ सेवा भरतीने भरण्यात येतात. तर वर्ग-३ मधील पदे प्रादेशिक निवड मंडळाकडून भरली जात असल्याचे निदर्शनास आले.

५.१३ वर्ग-४ मधील पदे जिल्हास्तरीय पदे असल्याने ठाणे, नाशिक, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली व रायगड या जिल्हयामध्ये अशी पदे शासनाच्या अनुसूचित जमातीसाठीच्या खास आरक्षण टक्केवारीने भरली जातात तर उर्वरित जिल्हयामध्ये ७ टक्के नुसार भरली जातात. वर्ग-४ मधील सर्व पदे सरळ सेवा भरतीने केली जातात.

५.१४ वर्ग-४ मध्ये सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी सर्व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे सेवेतील प्रमाण ९२ टक्के इतके आढळले. यामध्ये अनु.जाती १२ टक्के, अनु.जमाती ६७ टक्के, विजा/भज-४ टक्के तर इतर मागासवर्ग ९ टक्के आढळले. आदिवासी विकास विभागातील तक्ता क्र.४.९ ते ४.१८ ची पाहणी करता 'स्वयंपाकी' या संवर्गात अनु.जाती, विजा/भज व इमाव या गटातील अनुशेष आढळून आला. तसेच 'कामाठी' या संवर्गातही हीच स्थिती आढळून आली.

५.१५ आदिवासी विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील संपूर्ण महाराष्ट्रातील (मंत्रालय वगळून) सेवेमध्ये असलेल्या अनुसूचित जमातींच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रमाण ५१ टक्के तर सर्व मागासवर्गीय गटांचे प्रमाण ९० टक्के इतके असल्याचे दिसते.

५.१६ आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे आदिवासी विकास सेवेचे संवर्ग नियंत्रण अधिकारी आहेत. आदिवासी विकास सेवेतील वर्ग-२ , वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सेवा वर्ग-२ मधील सर्व पदांचे नियुक्ती प्राधिकारी, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हेच आहेत.

५.१७ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयातील वर्ग-१ व वर्ग-२ पदांचे तसेच कार्यालय अधीक्षक व तत्सम पदांचे नियुक्ती प्राधिकारी हे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हेच आहेत.

५.१८ ठराविक सामाजिक घटकातील व्यक्तीसाठीचे आरक्षित पद रिक्त असेल व असे पद भरणे अत्यंत गरजेचे नसेल तर अशा पदावर तात्पुरत्या स्वरुपाच्या इतर घटकातील व्यक्तींच्या नेमणूका करण्यात येत नाहीत.

५.१९ १०० बिंदू व ५० बिंदू नामावली नोंदवह्या आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त व इतर कार्यालयात ठेवण्यात आल्याचे दिसून आले.

५.२० असे निदर्शनास आले की, प्रत्येक कार्यालयात जेष्ठता याद्या दरवर्षी अद्ययावत केल्या जातात. त्यामध्ये मागासवर्गीयांचे क्रम आरक्षणानुसार लावले जातात.

५.२१ आदिवासी विकास महामंडळ, हे अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आले आहे. आदिवासी विकास महामंडळामधील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या पाहता अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे प्रमाण (७१ टक्के ) जास्त असल्याचे दिसते. आदिवासींच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी त्यांच्याच लोकांकडून चांगल्या प्रकारे होईल, या हेतूने अनुसूचित जमातींचे कर्मचारी जास्त प्रमाणात घेतले असल्याची शक्यता

नाकारता येणार नाही. महामंडळाकडून शासनाच्या मागासवर्गीयांच्या आरक्षण धोरणांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जातो, असे संबंधितांनी सांगितले.

५.२२ महामंडळाकडून विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता याद्या तयार करण्याचे काम चालू असल्याचे निदर्शनास आले.

## शिफारशी

५.२३ शासनाच्या आरक्षण धोरणांची अंमलबजावणी प्रशासकीय रचनेत सांभाळली जाते. ढोबळमानाने पाहिल्यास आदिवासी विकास विभागाच्या विविध कार्यालयात अनुसूचित जमातींचा अनुशेष विशेष नाही, असे म्हणावे लागेल. तथापि, प्रस्तुत मूल्यमापन अहवालात काही बाबींकडे संबंधितांचे लक्ष वेधण्यात येऊन त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना तथा शिफारशी करण्यात येत आहेत.

५.२४ शासनाच्या आरक्षण धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणीच्या दृष्टीने, आदिवासी विकास विभागात अन्य सामाजिक गटातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचा अनुशेष भरणे आवश्यक आहे.

५.२५ अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयात वर्ग-१ ते वर्ग-४ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सांख्यिकीय माहिती अद्ययावत करुन ती तात्काळ उपलब्धतेसाठी तयार ठेवणे आवश्यक वाटते.

५.२६ आदिवासी विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील काही कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता सूची तयार करतांना सदरचे पद हे नामनिर्देशन पध्दतीने भरले किंवा पदोन्नतीने भरले याचा उल्लेख आढळत नाही. यासाठी जेष्ठता सूचीत तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.

५.२७ जेष्ठता याद्या विहित मुदतीत तयार करणे व त्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणणे अत्यंत आवश्यक आहे. काही कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या जुन्याच जेष्ठता याद्या असल्याचे आढळून आले. अशा कार्यालयांनी कर्मचाऱ्यांच्या जेष्ठयता याद्या अद्ययावत करणे जरुरीचे आहे.

५.२८ अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादीमध्ये संबंधित जाती/जमातीचे नांव लिहिण्याबरोबरच शासनाने मान्य केलेल्या सामाजिक गटानुसार (उदा.अनु.जाती, अनु.जमाती इ.) अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वर्गीकरण असणे आवश्यक आहे.

५.२९ आदिवासी विकास विभागाने 'अन्य सामाजिक गटातील' अनुशेष यापुढे टप्प्याटप्प्याने व तातडीने भरुन काढणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्या गटातील व्यक्तींवर अन्याय होणार नाही.

५.३० शासनाने मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय/निमशासकीय सेवेत आरक्षण देण्याचा निर्णय दि.१९.६.९४ रोजी घेतला. तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अ ब क ड अशा प्रकारात वर्गीकरण करुन प्रत्येक प्रकारासाठी वेगवेगळी टक्केवारी ठरवून दिली. यातील काही प्रवर्गाची टक्केवारी अपूर्णांकात म्हणजे भ.ज(ब) २.५ टक्के, भ.ज(क)३.५ टक्के असल्याने १०० बिंदू नामावली वापरणे गैरसोयीचे झाले. त्यामुळे शासनाने दि.१५.२.९६ च्या शासन निर्णयानुसार सरळसेवा भरतीसाठी २०० बिंदू नामावलीचा वापर करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने देखील सरळसेवा भरतीचा अनुशेष काढतांना यापुढे २०० बिंदू नामावलीचा वापर करावा.

५.३१ आदिवासी भाग हा प्रामुख्याने डोंगराळ व अपूऱ्या नागरी सुविधा असलेला असतो. निवड झालेले उमेदवार त्या भागात जावयास फारसे उत्सुक नसतात. किंवा जे जातात ते फार काळ टिकून राहू शकत नाही. अशा परिस्थितीत मागासवर्गीयांचा अनुशेष शिल्लक राहणे शक्य आहे. यासाठी आदिवासी भागात उमेदवारा कायम टिकून राहणाच्या दृष्टीने तेथे जास्तीत जास्त नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. शिवाय, आदिवासी भागात काम करणाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्यात भरीव वाढ करणे आवश्यक आहे.

५.३२ आदिवासी विकास महामंडळात बहुसंख्येने आदिवासी जमातीचे कर्मचारी असल्याने अन्य सामाजिक गटातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना न्याय देण्यासाठी व त्यांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी यापुढे महामंडळाने अधिकारी/कर्मचाऱ्यांची

नियुक्ती करतांना आरक्षण धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच अन्य सामाजिक गटातील अनुशेष टप्प्याटप्प्याने भरुन काढावा.

५.३३ महामंडळाने आपल्या सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता याद्या अद्यायावत करुन कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

५.३४ आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयाप्रमाणे, महामंडळाने १०० बिंदू नामावली व ५० बिंदू नामावली नोंदवह्या ठेवाव्यात.

* * *

## प रि शि ष्ट 'अ' [२.१७]

शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षित
पदांवर मागासवर्गीयांची भरती करण्याबाबत
सरळ सेवा भरतीचा अनुशेष भरुन काढण्यासाठी
खास प्रयत्न

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.बीसीसी-१९८९/प्र.क्र.२२९/८९/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक- १२ जुलै, १९८९

## प रि प त्र क

शासकीय व निम-शासकीय सेवेत तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय संस्था, जिल्हा परिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, विद्यापीठे इत्यादी कडील मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांच्या संदर्भात आलेला सरळ सेवा भरतीचा अनुशेष विशेष प्रयत्न करुन ठराविक कालमर्यादेत भरुन काढण्याबाबत उपाययोजना करण्याचे शासनाने ठरविले आहे. या अनुषंगाने शासन आता सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

१. नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली सर्व संवर्गातील (वर्ग-१,२,३ व ४) मागासवर्गीयांच्या विविध गटांसाठी आरक्षित असलेल्या सरळ सेवा भरतीच्या पदांचा अनुशेषाचा त्वरीत आढावा घ्यावा आणि दि.३०.६.१९८९ रोजी असलेल्या अनुशेष संदर्भात पदे भरण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करावी. पदे भरण्याची परवानगी सरळ सेवा भरतीच्या अनुशेषाची पदे भरुन काढण्यासाठीच राहील व त्यांना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.आरआयएस-१०८५/सीआर-२७/अर्थसंकल्प-१९, दिनांक ४ सप्टेंबर, १९८६ मधील सेवा भरती बंधनाचे आदेश लागू राहणार नाहीत.

२. तसेच सतत सहा महिने रिक्त असलेली पदे भरण्याबाबत असलेले बंधन वरील अनुशेषाची पदे भरुन काढण्यासाठी लागू असणार नाही. मात्र ही अनुशेषाची पदे जर प्रस्तावित प्रयत्नाद्वारे भरली गेली नाहीत तर त्यानंतर तशा पदांना सहा महिने रिक्त असलेली पदे भरण्याबाबत असलेले बंधन लागू राहील.

३. दिनांक ३० जून, १९८९ रोजी असलेल्या अनुशेषामध्ये जी पदे बिगर आरक्षित न करता एतदर्थ किंवा इतर स्वरुपात भरली असतील ती पदेही भरण्यात यावीत. अशा प्रकरणी पदांवर सरळ सेवा प्रवेशाने नियुक्त केलेल्या बिगर मागासवर्गीयांना सेवामुक्त करावे किंवा पदोन्नत झालेल्यांना पदावनत करावे.

४.	आरक्षित पदांचा अनुशेष भरुन काढण्याच्या सदरील खास प्रयत्नांसाठी दिनांक ३० जून, १९८९ रोजी असलेल्या सरळसेवा भरतीच्या पदांचा अनुशेष वेगळा आरक्षित गट म्हणून दाखविण्यात यावा. याबाबत एका भरती प्रसंगी ५० टक्के पेक्षा पदे आरक्षित ठेवता येणार नाहीत असे जे सर्वसाधारण आदेश आहेत ते ह्या आरक्षित सरळसेवा भरतीच्या अनुशेषाला लागू होणार नाहीत. म्हणजेच दिनांक ३० जून, १९८९ रोजी असलेल्या आरक्षित सरळसेवा पदांचा संपूर्ण अनुशेष भरुन काढण्यास या खास प्रयत्नांच्या संदर्भात परवानगी राहील.

५.	जी वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे सरळसेवा प्रवेशाने सेवायोजना कार्यालय, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प/विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ आणि संचालक, आदिवासी विकास यांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांकडून भरण्यात येतात त्याबाबत विशेष भरती करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(अ) प्रथमत: सेवायोजन कार्यालय, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प/विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ आणि संचालक, आदिवासी विकास यांचेकडे नेहमीच्या पध्दतीनुसार मागणीपत्र पाठविण्यात यावे.

(ब) जर सेवायोजन कार्यालये, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प/विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ आणि संचालक, आदिवासी विकास यांचेकडून पंधरा दिवसात उमेदवार पाठविण्याबाबत प्रतिसाद मिळाला नाही तर नियुक्ती अधिकारी अशा पदांची जाहिरात देऊन अनुशेष भरण्याबाबत कार्यवाही करु शकतील. अशा प्रसंगी उमेदवारांनी त्यांचा सेवायोजन कार्यालयात नोंदणी केल्याचा क्रमांक अर्जात नमूद केलेला असावा आणि त्याची खातरजमा नेमणूक देण्यापूर्वी नियुक्ती अधिकाऱ्यांनी करावी.

जेव्हा सेवायोजन कार्यालय, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प/विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ, संचालक, आदिवासी विकास उमेदवारांची शिफारस उशिरा करतील तेव्हा जाहिरातीद्वारे मागविलेल्या अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या बरोबरीने अशा सेवायोजन कार्यालयाने, समाज कल्याण अधिकारी, आदिवासी प्रकल्प/विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ आणि संचालक,आदिवासी विकास यांनी शिफारस केलेल्या उमेदवारांचाही विचार करण्यात यावा.

२.	शासन असे आदेश देत आहे की, मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांचा अनुशेष भरुन काढण्याचे खास प्रयत्न विहित मुदतीत करावयाचे असल्यामुळे पदे जाहीर करणे, अर्ज मागविणे, मुलाखती घेणे, आणि प्रत्यक्ष नेमणूका करणे यांची खालीलप्रमाणे कालबध्द कार्यवाही करावी.

१)	सर्व नियुक्ती व सक्षम अधिकाऱ्यांनी/विभागांनी दि.३० जून, १९८९ रोजी असलेल्या अनुशेषांच्या पदांचा आढावा घेणे- दि.१ ऑगस्ट, १९८९ पूर्वी.

२)	नियुक्ती अधिकारी, सक्षम अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व प्रादेशिक निवड मंडळे यांनी पदे जाहिर करणे/अर्ज मागविणे- दि.१ सप्टेंबर, १९८९ पूर्वी.

३)	मुलाखती/परीक्षा घेणे आणि प्रत्यक्ष नेमणूका करणे- दि.१ ऑक्टोबर, १९८९ पूर्वी.

३.	जी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आहेत, त्याबाबतही वरील कार्यक्रम हाती

घ्यावा. दि.३० जून,१९८९ रोजी असलेल्या अनुशेषाची पदे जाहीर करुन निवड याद्या विभागांना पाठविण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन विभागाने आयोगाला सत्वर विनंती करावी.

४. त्याचप्रमाणे वर्ग-३ ची जी पदे प्रादेशिक निवड मंडळाच्या कक्षेत आहेत, त्याबाबतही दि.३० जून, १९८९ रोजी असलेल्या अनुशेषाची पदे जाहीर करुन निवड याद्या विभागांना पाठवून देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक नियुक्ती अधिकाऱ्याने संबंधित प्रादेशिक निवड मंडळास सत्वर विनंती करावी.

५. मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विविध महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय उपक्रम, सहकारी संस्था, अनुदानित संस्था, विद्यापीठे इत्यादीबाबत त्या त्या प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे सूचना निर्गमित कराव्यात आणि अनुशेष भरुन काढण्याचे काम त्या संस्थांकडून विहित कालमर्यादेत होईल, याची खात्री करुन घ्यावी.

६. विहित कालमर्यादेत अनुशेष भरुन काढण्याच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली असून ही समिती दर महिन्यास आढावा घेईल. तरी सर्व विभागांना व नियुक्ती अधिकाऱ्यांना वरील वेळापत्रकानुसार कार्यवाही पार पाडण्याबाबत आदेश देण्यात येत आहेत. याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर महिन्यात २६ तारखेपर्यंत सोबतच्या विवरणपत्रात सामान्य प्रशासन विभागाकडे मंत्रालयीन विभागांनी पाठवावा. यासाठी प्रत्येक विभागातील उप सचिव, आस्थापना/र.व का.यांची समन्वयक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी व सामान्य प्रशासन विभागास अहवाल पाठविण्याची जबाबदारी त्यांच्यावर मुक्रर करण्यात यावी.

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.सीआर-८७३/व्यय-४, दिनांक ८ जुलै, १९८९ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(द.म.सुकथनकर)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट-ब (२.१९)

सरळ भरतीची नमुनेवजा नामावली (१०० बिंदू नामावली)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| १ | अनुसूचित जाती | २६ | खुली | ५१ | खुली | ७६ | खुली |
| २ | अनुसूचित जमाती | २७ | खुली | ५२ | खुली | ७७ | खुली |
| ३ | वि.जा.भ.ज. | २८ | वि.जा.भ.ज. | ५३ | वि.जा.भ.ज. | ७८ | वि.जा.भ.ज. |
| ४ | इतर मागास वर्ग | २९ | खुली | ५४ | इतर मागास वर्ग | ७९ | खुली |
| ५ | खुली | ३० | अनुसूचित जमाती | ५५ | खुली | ८० | खुली |
| ६ | खुली | ३१ | खुली | ५६ | खुली | ८१ | अनुसूचित जाती |
| ७ | खुली | ३२ | खुली | ५७ | अनु.जाती | ८२ | खुली |
| ८ | खुली | ३३ | अनु.जाती | ५८ | अनुसूचित जमाती | ८३ | खुली |
| ९ | अनु.जाती | ३४ | इतर मागास वर्ग | ५९ | खुली | ८४ | इतर मागास वर्ग |
| १० | खुली | ३५ | खुली | ६० | खुली | ८५ | खुली |
| ११ | खुली | ३६ | खुली | ६१ | खुली | ८६ | अनुसूचित जमाती |
| १२ | खुली | ३७ | खुली | ६२ | खुली | ८७ | खुली |
| १३ | खुली | ३८ | खुली | ६३ | खुली | ८८ | खुली |
| १४ | इतर मागास वर्ग | ३९ | खुली | ६४ | इतर मागास वर्ग | ८९ | अनुसूचित जाती |
| १५ | खुली | ४० | खुली | ६५ | अनुसूचित जाती | ९० | खुली |
| १६ | अनु.जमाती | ४१ | अनुसूचित जाती | ६६ | खुली | ९१ | खुली |
| १७ | अनु.जाती | ४२ | खुली | ६७ | खुली | ९२ | खुली |
| १८ | खुली | ४३ | खुली | ६८ | खुली | ९३ | खुली |
| १९ | खुली | ४४ | अनु.जमाती | ६९ | खुली | ९४ | इतर मागास वर्ग |
| २० | खुली | ४५ | इतर मागास वर्ग | ७० | खुली | ९५ | खुली |
| २१ | खुली | ४६ | खुली | ७१ | खुली | ९६ | खुली |
| २२ | खुली | ४७ | खुली | ७२ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| २३ | खुली | ४८ | खुली | ७३ | अनुसूचित जाती | ९८ | खुली |
| २४ | इतर मागास वर्ग | ४९ | अनु.जाती | ७४ | इतर मागास वर्ग | ९९ | खुली |
| २५ | अनुसूचित जाती | ५० | खुली | ७५ | खुली | १०० | खुली |

| अ.क्र. | संवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती | १३ |
| २ | अनुसुचित जमाती | ७ |
| ३ | वि.जा.भ.जमाती | ४ |
| ४ | इतर मागास वर्ग | १० |
| | एकूण | ३४ |
| ५ | खुली | ६६ |
| | एकूण | १०० |

## परिशिष्ट-क (२.२२)

### ठाणे, नाशिक व धुळे जिल्हयांकरिता स्वतंत्र १०० बिंदू नामावली (अनुसूचित जमातीकरिता २०% आरक्षण)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| १ | अनुसूचित जाती | २६ | अनुसूचित जमाती | ५१ | खुली | ७६ | खुली |
| २ | अनुसूचित जमाती | २७ | खुली | ५२ | खुली | ७७ | अनुसूचित जमाती |
| ३ | वि.जा.भ.ज. | २८ | वि.जा.भ.ज. | ५३ | वि.जा.भ.ज. | ७८ | वि.जा.भ.ज. |
| ४ | इतर मागास वर्ग | २९ | खुली | ५४ | इतर मागास वर्ग | ७९ | खुली |
| ५ | खुली | ३० | अनुसूचित जमाती | ५५ | अनुसूचित जमाती | ८० | खुली |
| ६ | खुली | ३१ | खुली | ५६ | खुली | ८१ | अनुसूचित जाती |
| ७ | खुली | ३२ | खुली | ५७ | अनु.जाती | ८२ | अनुसूचित जमाती |
| ८ | अनुसूचित जमाती | ३३ | अनु.जाती | ५८ | अनुसूचित जमाती | ८३ | खुली |
| ९ | अनुसूचित जाती | ३४ | इतर मागास वर्ग | ५९ | खुली | ८४ | इतर मागास वर्ग |
| १० | खुली | ३५ | अनुसूचित जमाती | ६० | खुली | ८५ | खुली |
| ११ | खुली | ३६ | खुली | ६१ | खुली | ८६ | अनुसूचित जमाती |
| १२ | खुली | ३७ | खुली | ६२ | खुली | ८७ | खुली |
| १३ | अनुसूचित जमाती | ३८ | खुली | ६३ | अनुसूचित जमाती | ८८ | खुली |
| १४ | इतर मागास वर्ग | ३९ | खुली | ६४ | इतर मागास वर्ग | ८९ | अनुसूचित जाती |
| १५ | खुली | ४० | अनुसूचित जमाती | ६५ | अनुसूचित जाती | ९० | खुली |
| १६ | अनु.जमाती | ४१ | अनुसूचित जाती | ६६ | खुली | ९१ | अनुसूचित जमाती |
| १७ | अनु.जाती | ४२ | खुली | ६७ | खुली | ९२ | खुली |
| १८ | खुली | ४३ | खुली | ६८ | अनुसूचित जमाती | ९३ | खुली |
| १९ | खुली | ४४ | अनु.जमाती | ६९ | खुली | ९४ | इतर मागास वर्ग |
| २० | खुली | ४५ | इतर मागास वर्ग | ७० | खुली | ९५ | अनुसूचित जमाती |
| २१ | अनुसूचित जमाती | ४६ | खुली | ७१ | खुली | ९६ | खुली |
| २२ | खुली | ४७ | खुली | ७२ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| २३ | खुली | ४८ | खुली | ७३ | अनुसूचित जाती | ९८ | खुली |
| २४ | इतर मागास वर्ग | ४९ | अनु.जाती | ७४ | इतर मागास वर्ग | ९९ | खुली |
| २५ | अनुसूचित जाती | ५० | अनुसूचित जमाती | ७५ | खुली | १०० | अनुसूचित जमाती |

| अ.क्र. | संवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ |
| २ | अनुसूचित जमाती | २२ |
| ३ | वि.जा.भ.जमाती | ४ |
| ४ | इतर मागास वर्ग | १० |
| | एकूण | ४९ |
| ५ | खुली | ५१ |
| | एकूण | १०० |

## परिशिष्ट-ड (२.२२)

### चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयांसाठी स्वतंत्र १०० बिंदू नामावली (अनुसूचित जमातीसाठी १५ टक्के आरक्षण)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| १ | अनुसूचित जाती | २६ | खुली | ५१ | खुली | ७६ | खुली |
| २ | अनुसूचित जमाती | २७ | खुली | ५२ | खुली | ७७ | खुली |
| ३ | वि.जा.भ.ज. | २८ | वि.जा.भ.ज. | ५३ | वि.जा.भ.ज. | ७८ | वि.जा.भ.ज. |
| ४ | इतर मागास वर्ग | २९ | खुली | ५४ | इतर मागास वर्ग | ७९ | अनुसूचित जमाती |
| ५ | खुली | ३० | अनुसूचित जमाती | ५५ | खुली | ८० | खुली |
| ६ | खुली | ३१ | खुली | ५६ | खुली | ८१ | अनुसूचित जाती |
| ७ | खुली | ३२ | खुली | ५७ | अनु.जाती | ८२ | खुली |
| ८ | अनुसुचित जमाती | ३३ | अनु.जाती | ५८ | अनुसुचित जमाती | ८३ | खुली |
| ९ | अनुसुचित जाती | ३४ | इतर मागास वर्ग | ५९ | खुली | ८४ | इतर मागास वर्ग |
| १० | खुली | ३५ | खुली | ६० | खुली | ८५ | खुली |
| ११ | खुली | ३६ | अनुसुचित जमाती | ६१ | खुली | ८६ | अनुसूचित जमाती |
| १२ | खुली | ३७ | खुली | ६२ | खुली | ८७ | खुली |
| १३ | खुली | ३८ | खुली | ६३ | खुली | ८८ | खुली |
| १४ | इतर मागास वर्ग | ३९ | खुली | ६४ | इतर मागास वर्ग | ८९ | अनुसूचित जाती |
| १५ | खुली | ४० | खुली | ६५ | अनुसुचित जाती | ९० | खुली |
| १६ | अनु.जमाती | ४१ | अनुसूचित जाती | ६६ | अनुसुचित जमाती | ९१ | खुली |
| १७ | अनु.जाती | ४२ | खुली | ६७ | खुली | ९२ | खुली |
| १८ | खुली | ४३ | खुली | ६८ | खुली | ९३ | अनुसूचित जमाती |
| १९ | खुली | ४४ | अनुसूचित जमाती | ६९ | खुली | ९४ | इतर मागास वर्ग |
| २० | खुली | ४५ | इतर मागास वर्ग | ७० | खुली | ९५ | खुली |
| २१ | खुली | ४६ | खुली | ७१ | खुली | ९६ | खुली |
| २२ | खुली | ४७ | खुली | ७२ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| २३ | अनुसूचित जमाती | ४८ | खुली | ७३ | अनुसूचित जाती | ९८ | खुली |
| २४ | इतर मागास वर्ग | ४९ | अनु.जाती | ७४ | इतर मागास वर्ग | ९९ | खुली |
| २५ | अनुसूचित जाती | ५० | अनुसूचित जमाती | ७५ | खुली | १०० | अनुसूचित जमाती |

| अ.क्र. | संवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ |
| २ | अनुसूचित जमाती | १५ |
| ३ | वि.जा.भ.जमाती | ४ |
| ४ | इतर मागास वर्ग | १० |
| | एकूण | ४२ |
| ५ | खुली | ५८ |
| | एकूण | १०० |

## परिशिष्ट-इ (२.२२)

## यवतमाळ जिल्हयांसाठी स्वतंत्र १०० बिंदू नामावली (अनुसूचित जमातीकरिता १४ टक्के आरक्षण)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| १ | अनुसूचित जाती | २६ | खुली | ५१ | खुली | ७६ | खुली |
| २ | अनुसूचित जमाती | २७ | खुली | ५२ | खुली | ७७ | खुली |
| ३ | वि.जा.भ.ज. | २८ | वि.जा.भ.ज. | ५३ | वि.जा.भ.ज. | ७८ | वि.जा.भ.ज. |
| ४ | इतर मागास वर्ग | २९ | खुली | ५४ | इतर मागास वर्ग | ७९ | अनुसूचित जमाती |
| ५ | खुली | ३० | अनुसूचित जमाती | ५५ | खुली | ८० | खुली |
| ६ | खुली | ३१ | खुली | ५६ | खुली | ८१ | अनुसूचित जाती |
| ७ | खुली | ३२ | खुली | ५७ | अनु.जाती | ८२ | खुली |
| ८ | अनुसूचित जमाती | ३३ | अनु.जाती | ५८ | अनुसूचित जमाती | ८३ | खुली |
| ९ | अनुसूचित जाती | ३४ | इतर मागास वर्ग | ५९ | खुली | ८४ | इतर मागास वर्ग |
| १० | खुली | ३५ | खुली | ६० | खुली | ८५ | खुली |
| ११ | खुली | ३६ | अनुसूचित जमाती | ६१ | खुली | ८६ | अनुसूचित जमाती |
| १२ | खुली | ३७ | खुली | ६२ | खुली | ८७ | खुली |
| १३ | खुली | ३८ | खुली | ६३ | खुली | ८८ | खुली |
| १४ | इतर मागास वर्ग | ३९ | खुली | ६४ | इतर मागास वर्ग | ८९ | अनुसूचित जाती |
| १५ | खुली | ४० | खुली | ६५ | अनुसूचित जाती | ९० | खुली |
| १६ | अनु.जमाती | ४१ | अनुसूचित जाती | ६६ | अनुसूचित जमाती | ९१ | खुली |
| १७ | अनु.जाती | ४२ | खुली | ६७ | खुली | ९२ | खुली |
| १८ | खुली | ४३ | खुली | ६८ | खुली | ९३ | अनुसूचित जमाती |
| १९ | खुली | ४४ | अनुसूचित जमाती | ६९ | खुली | ९४ | इतर मागास वर्ग |
| २० | खुली | ४५ | इतर मागास वर्ग | ७० | खुली | ९५ | खुली |
| २१ | खुली | ४६ | खुली | ७१ | खुली | ९६ | खुली |
| २२ | खुली | ४७ | खुली | ७२ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| २३ | अनुसूचित जमाती | ४८ | खुली | ७३ | अनुसूचित जाती | ९८ | खुली |
| २४ | इतर मागास वर्ग | ४९ | अनु.जाती | ७४ | इतर मागास वर्ग | ९९ | खुली |
| २५ | अनुसूचित जाती | ५० | अनुसूचित जमाती | ७५ | खुली | १०० | खुली |

| अ.क्र. | संवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ |
| २ | अनुसूचित जमाती | १४ |
| ३ | वि.जा.भ.जमाती | ४ |
| ४ | इतर मागास वर्ग | १० |
| | एकूण | ४१ |
| ५ | खुली | ५९ |
| | एकूण | १०० |

## परिशिष्ट-फ (२.२२)

## रायगड, (कुलाबा) जिल्हयांसाठी स्वतंत्र १०० बिंदू नामावली (अनुसूचित जमातीकरिता ९ टक्के आरक्षण)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| १ | अनुसूचित जाती | २६ | खुली | ५१ | खुली | ७६ | खुली |
| २ | अनुसूचित जमाती | २७ | खुली | ५२ | खुली | ७७ | खुली |
| ३ | वि.जा.भ.ज. | २८ | वि.जा.भ.ज. | ५३ | वि.जा.भ.ज. | ७८ | वि.जा.भ.ज. |
| ४ | इतर मागास वर्ग | २९ | खुली | ५४ | इतर मागास वर्ग | ७९ | खुली |
| ५ | खुली | ३० | अनुसूचित जमाती | ५५ | खुली | ८० | खुली |
| ६ | खुली | ३१ | खुली | ५६ | खुली | ८१ | अनुसूचित जाती |
| ७ | खुली | ३२ | खुली | ५७ | अनु.जाती | ८२ | खुली |
| ८ | अनुसूचित जमाती | ३३ | अनु.जाती | ५८ | अनुसूचित जमाती | ८३ | खुली |
| ९ | अनुसूचित जाती | ३४ | इतर मागास वर्ग | ५९ | खुली | ८४ | इतर मागास वर्ग |
| १० | खुली | ३५ | खुली | ६० | खुली | ८५ | खुली |
| ११ | खुली | ३६ | खुली | ६१ | खुली | ८६ | अनुसूचित जमाती |
| १२ | खुली | ३७ | खुली | ६२ | खुली | ८७ | खुली |
| १३ | खुली | ३८ | खुली | ६३ | खुली | ८८ | खुली |
| १४ | इतर मागास वर्ग | ३९ | खुली | ६४ | इतर मागास वर्ग | ८९ | अनुसूचित जाती |
| १५ | खुली | ४० | खुली | ६५ | अनुसूचित जाती | ९० | खुली |
| १६ | अनु.जमाती | ४१ | अनुसूचित जाती | ६६ | अनुसूचित जमाती | ९१ | खुली |
| १७ | अनु.जाती | ४२ | खुली | ६७ | खुली | ९२ | खुली |
| १८ | खुली | ४३ | खुली | ६८ | खुली | ९३ | खुली |
| १९ | खुली | ४४ | अनुसूचित जमाती | ६९ | खुली | ९४ | इतर मागास वर्ग |
| २० | खुली | ४५ | इतर मागास वर्ग | ७० | खुली | ९५ | खुली |
| २१ | खुली | ४६ | खुली | ७१ | खुली | ९६ | खुली |
| २२ | खुली | ४७ | खुली | ७२ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| २३ | खुली | ४८ | खुली | ७३ | अनुसूचित जाती | ९८ | खुली |
| २४ | इतर मागास वर्ग | ४९ | अनु.जाती | ७४ | इतर मागास वर्ग | ९९ | खुली |
| २५ | अनुसूचित जाती | ५० | अनुसूचित जमाती | ७५ | खुली | १०० | खुली |

| अ.क्र. | संवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ |
| २ | अनुसूचित जमाती | ९ |
| ३ | वि.जा.भ.जमाती | ४ |
| ४ | इतर मागास वर्ग | १० |
| | एकूण | ३६ |
| ५ | खुली | ६४ |
| | एकूण | १०० |

परिशिष्ट-ग (२.२५)

## पदोन्नतीची नमुनेवजा नामावली (५० बिंदू नामावली)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | १ | २ |
| १ | अनुसूचित जाती | १८ | खुली | ३५ | खुली |
| २ | अनुसूचित जमाती | १९ | खुली | ३६ | खुली |
| ३ | वि.जा.भ.ज. | २० | खुली | ३७ | खुली |
| ४ | खुली | २१ | खुली | ३८ | खुली |
| ५ | खुली | २२ | खुली | ३९ | खुली |
| ६ | खुली | २३ | खुली | ४० | खुली |
| ७ | खुली | २४ | खुली | ४१ | अनुसूचित जाती |
| ८ | खुली | २५ | अनुसूचित जाती | ४२ | खुली |
| ९ | अनुसूचित जाती | २६ | खुली | ४३ | खुली |
| १० | खुली | २७ | खुली | ४४ | अनुसूचित जमाती |
| ११ | खुली | २८ | वि.जा.भ.ज. | ४५ | खुली |
| १२ | खुली | २९ | खुली | ४६ | खुली |
| १३ | खुली | ३० | अनुसूचित जमाती | ४७ | खुली |
| १४ | खुली | ३१ | खुली | ४८ | खुली |
| १५ | खुली | ३२ | खुली | ४९ | अनु.जाती |
| १६ | अनु.जमाती | ३३ | अनु.जाती | ५० | खुली |
| १७ | अनु.जाती | ३४ | खुली | | |

| अ.क्र. | संवर्ग | संख्या |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ७ |
| २ | अनुसूचित जमाती | ४ |
| ३ | वि.जा.भ.जमाती | २ |
| | एकूण | १३ |

परिशिष्ट - ५

सुधारित बिंदू नामावली सरळ सेवा आणि पदोन्नती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 15 फेब्रुवारी, 1996.

**प्रस्तावना :-** शासन निर्णय, समक्रमांक दिनांक 15 सप्टेंबर, 1995 द्वारे विहित करण्यात आलेली सरळ सेवेची 200 बिंदू नामावली आणि शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दिनांक 26 जुलै, 1995 अन्वये विहित केलेली पदोन्नतीची 50 बिंदू नामावली ह्या दोनही बिंदू नामावल्या मागे घेतल्याची घोषणा शासनातर्फे दिनांक 19 डिसेंबर, 1995 रोजी विधान परिषदेतील चर्चे प्रसंगी करण्यात आली होती. सदर बिंदू नामावल्या मागे घेतल्यास त्याऐवजी कोणत्या बिंदू नामावल्या विहित करण्यात याव्यात याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यासंदर्भात आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

1. **शासन निर्णय :-** शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दिनांक 26 जुलै,1995 आणि शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब, दिनांक 15 सप्टेंबर, 1995 या आदेशां-द्वारे विहित करण्यात आलेल्या अनुक्रमे 50 बिंदू नामावली आणि 200 बिंदू नामावली या दोन्ही बिंदू नामावल्या या शासन निर्णयाद्वारे विधान परिषदेतील चर्चेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून मागे घेण्यात येत आहेत. सुधारित बिंदू नामावल्या लवकरच निर्गमित करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून सोबत जोडलेली 50 बिंदू नामावली पदोन्नतीसाठी आणि 200 बिंदू नामावली सरळ सेवा भरतीसाठी विहित करण्यात येत आहे.

ही नामावली दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून प्रथम बिंदू पासून वापरण्यात यावी. मात्र, दिनांक 18 डिसेंबर, 1995 रोजी पूर्वीच्या बिंदू नामावलीप्रमाणे असलेला मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घेण्यात यावा. दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून हे आदेश निर्गमित करण्यापर्यन्तच्या कालावधीत या पूर्वीच्या म्हणजे दिनांक 26 जुलै, 1995 व दिनांक 15 सप्टेंबर, 1995 च्या आदेशांनुसार भरती/पदोन्नतीबाबत काही कार्यवाही करण्यात आली असेल तर त्याची नोंद नवीन बिंदू नामावलीत घेण्यात यावी व त्या अनुषंगाने काही अनुशेष निर्माण होत असेल तर तो देखील विचारात घेण्यात यावा.

यापूर्वी म्हणजे दिनांक 18 डिसेंबर, 1995 पर्यन्त कार्यवाही पूर्ण झालेल्या म्हणजे सरळ सेवेतील मागणीपत्र पाठवून उमेदवार उपलब्ध झाले असल्यास, पदोन्नतीसंदर्भात नियुक्ती सक्षम प्राधिका-याच्या स्तरावर मान्य झाली असल्यास, अशा प्रकरणी सुधारणा करण्याची आवश्यकता नाही. मात्र, दिनांक 18 डिसेंबर, 1995 नंतर करण्यात येणारी कार्यवाही व वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण न झालेली प्रकरणे सोबत जोडलेल्या बिंदू नामावल्यांप्रमाणे करण्यात यावीत.

सरळ सेवेमध्ये महिलांसाठी असलेले 30% आरक्षण त्या त्या प्रवर्गात टक्केवारीनुसार विचारात घेण्याची कार्यवाही 2. संबंधित नियुक्ती प्राधिका-यांनी करावी.

सर्व शासकीय कार्यालयांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी आणि त्यानुसार कार्यवाही करावी. मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना कळवावेत तसेच निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादी आस्थापनांमध्ये हे आदेश लागू करण्यासंबंधात स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन विभागांनी तात्काळ निर्गमित करावेत.

शा.म.मु.रोटा/सा.प्र.वि./एक-1440(6000-2-96)-1

या संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशांच्या प्रती या विभागासही पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

क. श्रीनिवासराव,
प्रधान सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

---------

* पत्राने.

एन-1440(6000-2-96)-13.

## सरळ भरतीची नमुनेवजा 200 बिंदु नामावली.

| अनु-क्रमांक | पदे राखील किंवा खुली आहेत. | अनु-क्रमांक | पदे राखील किंवा खुली आहेत. |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 1. | 2. |
| 1. | अनुसूचित जाती | 41. | अनुसूचित जाती |
| 2. | अनुसूचित जमाती | 42. | खुली |
| 3. | विमुक्त जाती (अ) | 43. | खुली |
| 4. | भटक्या जमाती (ब) | 44. | अनुसूचित जमाती |
| 5. | इतर मागास वर्ग | 45. | खुली |
| 6. | खुली | 46. | खुली |
| 7. | खुली | 47. | इतर मागास वर्ग |
| 8. | खुली | 48. | खुली |
| 9. | अनुसूचित जाती | 49. | अनुसूचित जाती |
| 10. | इतर मागास वर्ग | 50. | भटक्या जमाती (ड) |
| 11. | विशेष मागास प्रवर्ग | 51. | खुली |
| 12. | खुली | 52. | इतर मागास वर्ग |
| 13. | खुली | 53. | खुली |
| 14. | खुली | 54. | खुली |
| 15. | इतर मागास वर्ग | 55. | खुली |
| 16. | अनुसूचित जमाती | 56. | भटक्या जमाती (क) |
| 17. | अनुसूचित जाती | 57. | अनुसूचित जाती |
| 18. | खुली | 58. | अनुसूचित जमाती |
| 19. | खुली | 59. | इतर मागास वर्ग |
| 20. | खुली | 60. | खुली |
| 21. | इतर मागास वर्ग | 61. | खुली |
| 22. | खुली | 62. | विशेष मागास प्रवर्ग |
| 23. | खुली | 63. | इतर मागास वर्ग |
| 24. | खुली | 64. | खुली |
| 25. | अनुसूचित जाती | 65. | अनुसूचित जाती |
| 26. | इतर मागास वर्ग | 66. | अपंग (मुकबधीर) |
| 27. | खुली | 67. | विमुक्त जाती (अ) |
| 28. | खुली | 68. | इतर मागास वर्ग |
| 29. | भटक्या जमाती (क) | 69. | खुली |
| 30. | अनुसूचित जमाती | 70. | खुली |
| 31. | इतर मागास वर्ग | 71. | खुली |
| 32. | खुली | 72. | अनुसूचित जमाती |
| 33. | अपंग (अंध) | 73. | अनुसूचित जाती |
| 34. | अनुसूचित जाती | 74. | इतर मागास वर्ग |
| 35. | खुली | 75. | खुली |
| 36. | इतर मागास वर्ग | 76. | खुली |
| 37. | खुली | 77. | खुली |
| 38. | खुली | 78. | इतर मागास वर्ग |
| 39. | खुली | 79. | खुली |
| 40. | इतर मागास वर्ग | 80. | खुली |

| अनु-क्रमांक 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत. 2. | अनु-क्रमांक 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत. 2. |
|---|---|---|---|
| 81. | अनुसूचित जाती | 121. | खुली |
| 82. | भटक्या जमाती (ब) | 122. | खुली |
| 83. | खुली | 123. | खुली |
| 84. | इतर मागास वर्ग | 124. | खुली |
| 85. | खुली | 125. | अनुसूचित जाती |
| 86. | अनुसूचित जमाती | 126. | इतर मागास वर्ग |
| 87. | भटक्या जमाती (क) | 127. | खुली |
| 88. | खुली | 128. | खुली |
| 89. | अनुसूचित जाती | 129. | खुली |
| 90. | इतर मागास वर्ग | 130. | अनुसूचित जमाती |
| 91. | खुली | 131. | इतर मागास वर्ग |
| 92. | खुली | 132. | खुली |
| 93. | खुली | 133. | अपंग (अंध) |
| 94. | इतर मागास वर्ग | 134. | अनुसूचित जाती |
| 95. | अनुसूचित जाती | 135. | खुली |
| 96. | खुली | 136. | इतर मागास वर्ग |
| 97. | विमुक्त जाती (अ) | 137. | खुली |
| 98. | इतर मागास वर्ग | 138. | खुली |
| 99. | अपंग (अस्थिव्यंग) | 139. | खुली |
| 100. | भटक्या जमाती (ड) | 140. | खुली |
| 101. | अनुसूचित जाती | 141. | अनुसूचित जाती |
| 102. | अनुसूचित जमाती | 142. | इतर मागास वर्ग |
| 103. | विमुक्त जाती (अ) | 143. | भटक्या जमाती (क) |
| 104. | भटक्या जमाती (ब) | 144. | अनुसूचित जमाती |
| 105. | इतर मागास वर्ग | 145. | खुली |
| 106. | खुली | 146. | खुली |
| 107. | विशेष मागास प्रवर्ग | 147. | इतर मागास वर्ग |
| 108. | खुली | 148. | खुली |
| 109. | अनुसूचित जाती | 149. | अनुसूचित जाती |
| 110. | इतर मागास वर्ग | 150. | भटक्या जमाती (ड) |
| 111. | खुली | 151. | खुली |
| 112. | खुली | 152. | इतर मागास वर्ग |
| 113. | खुली | 153. | खुली |
| 114. | भटक्या जमाती (क) | 154. | खुली |
| 115. | इतर मागास वर्ग | 155. | खुली |
| 116. | अनुसूचित जमाती | 156. | इतर मागास वर्ग |
| 117. | अनुसूचित जाती | 157. | अनुसूचित जाती |
| 118. | खुली | 158. | अनुसूचित जमाती |
| 119. | इतर मागास वर्ग | 159. | खुली |
| 120. | खुली | 160. | खुली |

पुम-1440(6000-2-96)-23.

| अनु-क्रमांक 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत 2. | अनु-क्रमांक. 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत. 2. |
|---|---|---|---|
| 161. | भटक्या जमाती (ब) | 181. | अनुसूचित जाती |
| 162. | इतर मागास वर्ग | 182. | खुली |
| 163. | विशेष मागास प्रवर्ग | 183. | इतर मागास वर्ग |
| 164. | खुली | 184. | खुली |
| 165. | अनुसूचित जाती | 185. | खुली |
| 166. | अपंग (मूक बधीर) | 186. | अनुसूचित जमाती |
| 167. | विमुक्त जाती (अ) | 187. | खुली |
| 168. | इतर मागास वर्ग | 188. | खुली |
| 169. | खुली | 189. | अनुसूचित जाती |
| 170. | खुली | 190. | इतर मागास वर्ग |
| 171. | खुली | 191. | खुली |
| 172. | अनुसूचित जमाती | 192. | खुली |
| 173. | अनुसूचित जाती | 193. | विमुक्त जाती (अ) |
| 174. | भटक्या जमाती (क) | 194. | इतर मागास वर्ग |
| 175. | इतर मागास वर्ग | 195. | अनुसूचित जाती |
| 176. | खुली | 196. | भटक्या जमाती (ब) |
| 177. | खुली | 197. | भटक्या जमाती (क) |
| 178. | इतर मागास वर्ग | 198. | इतर मागास वर्ग |
| 179. | खुली | 199. | अपंग (अस्थिव्यंग) |
| 180. | खुली | 200. | भटक्या जमाती (ड) |

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | अनुसूचित जाती | 13% | 26 |
| (2) | अनुसूचित जमाती | 7% | 14 |
| (3) | विमुक्त जाती (अ) (14 व तत्सम जाती) | 3% | 6 |
| (4) | भटक्या जमाती (ब) (जानेवारी, 1990 पूर्वीच्या 28 व तत्सम जमाती) | 2.5% | 5 |
| (5) | भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) | 3.5% | 7 |
| (6) | भटक्या जमाती (ड) (वंजारी व तत्सम जमाती) | 2% | 4 |
| (7) | इतर मागास वर्ग | 19% | 38 |
| (8) | विशेष मागास वर्ग | 2% | 4 |
| | एकूण राखीव पदांची संख्या | | 104 |
| | खुल्या पदांची संख्या | | 96 |
| | | एकूण - | 200 |

## पदोन्नतीची 50 बिंदू नमुनेदार नामावली

| अनु-क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत. | अनु. क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत. |
|---|---|---|---|
| 1. | 2 | 1. | 2 |
| 1. | अनुसूचित जाती | 26. | खुली |
| 2. | अनुसूचित जमाती | 27. | खुली |
| 3. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | 28. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| 4. | खुली | 29. | खुली |
| 5. | खुली | 30. | अनुसूचित जमाती |
| 6. | खुली | 31. | खुली |
| 7. | खुली | 32. | खुली |
| 8. | खुली | 33. | अनुसूचित जाती |
| 9. | अनुसूचित जाती | 34. | खुली |
| 10. | खुली | 35. | खुली |
| 11. | विशेष मागास प्रवर्ग | 36. | खुली |
| 12. | खुली | 37. | खुली |
| 13. | खुली | 38. | खुली |
| 14. | खुली | 39. | खुली |
| 15. | खुली | 40. | खुली |
| 16. | अनुसूचित जमाती | 41. | अनुसूचित जाती |
| 17. | अनुसूचित जाती | 42. | खुली |
| 18. | खुली | 43. | खुली |
| 19. | खुली | 44. | अनुसूचित जमाती |
| 20. | खुली | 45. | खुली |
| 21. | खुली | 46. | खुली |
| 22. | खुली | 47. | खुली |
| 23. | खुली | 48. | खुली |
| 24. | खुली | 49. | अनुसूचित जाती |
| 25. | अनुसूचित जाती | 50. | विमुक्त जाती व भटक्या जमाती. |

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | 7 |
| अनुसूचित जमाती | 4 |
| विमुक्त जाती व भटक्या जमाती | 3 |
| विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| खुल्या पदांची संख्या | 35 |

---



एच-1440(6000-2-96)-3अ.